महाराष्ट्र शासन

# प्लास्टिक उद्योगातील रोजगारासंबंधात किमान वेतन (पुनर्विलोकन समितीचा)

# अहवाल

# १९७६


१९७७

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय

मुंबई

[किमत - ९० पैसे]

AcN.

महाराष्ट्र शासन

# प्लास्टिक उद्योगातील रोजगारासंबंधात किमान वेतन (पुनर्विलोकन समितीचा) अहवाल

१९७६

माननीय कामगार मंत्री श्री. शं. बा. पाटील यांना [illegible] संबंधात किमान वेतन (पुर्नविलोकन समिती) (१९७६) आपला अहवाल सादर करीत आहे.

सादर केल्याचा दिनांक ३० जून १९७६

**अध्यक्ष**

श्री. उमर अब्दुल अझीझ काझी, विधानसभा सदस्य

**सदस्य**

श्री. जे. एम. जयसिंग,
श्री. बी. एल. बूलानी,
श्री. डी. पी. आचार्य,
श्री. हरगोविंद बजाज,
श्री. पी. एल. मानकर,
श्री. जी. एम. खोडे,
श्री. शरद जे. राव,
श्री. जी. आर. खानोलकर,

**सचिव**

श्रीमती एस. पी. गायतोंडे,
सहाय्यक कामगार आयुक्त, मुंबई.

# अनुक्रमणिका


| प्रकरण | | पृष्ठ |
|---|---|---|
| एक | प्रास्ताविक— | |
| | समितीची नियुक्ती .. .. .. | १ |
| | समितीचा कर्मचारीवर्ग .. .. .. | १ |
| | विचारार्थ विषय—अहवाल सादर करण्याचा कालावधी .. | २ |
| | कार्यपद्धती .. .. | २ |
| | समितीचा दौऱ्यांचा कार्यक्रम .. .. | ३ |
| दोन | उद्योगाचे स्वरूप— | |
| | उद्योगाची व्याप्ती .. .. .. | ६ |
| | उद्योगाची जडणघडण .. .. .. | ६ |
| | प्लास्टिक उद्योगातील निर्मिती प्रक्रिया .. .. | ७ |
| | प्रक्रिया—उत्पादित .. .. .. | ७ |
| | तयार माल—अलिकडील काळात सुरू करण्यात आलेल्या नवीन पद्धती. | ८ |
| | राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत प्लास्टिक उद्योगाने घातलेली भर .. | ८ |
| तीन | मालक व त्यांच्या संघटना यांचे विचार .. .. | १० |
| चार | कामगारांच्या प्रतिनिधींचे विचार .. .. | १७ |
| पाच | वेतनाची समस्या— | |
| | अनुसूचीकडून मिळालेले वेतनाचे चालू स्वरूप .. | २० |
| | मिळवलेल्या माहितीचा सारांश .. .. | २० |
| | इतर तत्सम उद्योगांमधील तुलनात्मक किमान वेतनाची .. माहिती .. .. .. .. | २० |
| | राहणीमान खर्चाचा निर्देशांक व मजुरी .. .. | २३ |
| | किमान वेतनाची संकल्पना व त्याबाबतचा आमचा .. दृष्टिकोन. | २३ |
| | किमान वेतनाच्या कक्षेतून वगळण्यासंबंधीचा युक्तिवाद .. | २४ |

## अनुक्रमणिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| सहा | शिफारशी— | |
| | प्रस्तावना—कमचाऱ्यांचे वर्गीकरण .. .. | २६ |
| | सुचविलेले किमान वेतन .. .. | २७ |
| | विभाग .. .. .. .. | २९ |
| | विशेष भत्त्यासाठी तरतूद .. .. .. | २९ |
| | निष्कर्ष .. .. .. .. | ३० |
| | ऋणनिर्देश .. .. .. .. | ४३ |
| जोडपत्र | | |
| अ ते क | प्रचार प्रश्नावलीच्या आधारे गोळा केलेल्या माहितीनुसार मुंबईतील प्लास्टिक उद्योगांतील अकुशल, अर्धकुशल व कुशल वर्गाचे किमान व कमाल दैनिक वेतन. | ४५ |
| क-१ | प्लास्टिक उद्योगातील किमान व कमाल दैनिक वेतन दर्शवणारे विवरणपत्र (समितीचे करार करून आणि कराराशिवाय मिळवलेल्या उत्तरांमधून संकलित केलेले): | ५० |
| क-२ | किमान व कमाल दैनिक वेतन दर दर्शवणारे विवरणपत्र (तोंडी साक्षीतून मिळालेले). | ५१ |
| ड | ज्या मालक व श्रमिक संघटनांकडे प्रश्नावली पाठवण्यात आली त्या संघटनांची सूची. | ५२ |
| दहा | १५ जून १९७६ रोजीची शासकीय अधिसूचना .. | ५७ |

# प्रकरण एक

## प्रास्ताविक

**समितीची नियुक्ती**

१.१. किमान वेतन अधिनियम, १९४८ (१९४८ चा अकरा) याचे पोट-कलम ५, खंड (अ) अनुसार काढण्यात आलेला शासन निर्णय, उद्योग व कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्यूए. ५७७४/२०३४७३-एलएबी-तीन-ए, दिनांक ३ फेब्रुवारी १९७५ याद्वारे महाराष्ट्र शासनाने ज्या उद्योगांमध्ये उष्णतेच्या सहाय्याने आणि किंवा दाब देऊन किंवा दोन्हींच्या सहाय्याने साच्यात घालून, आकार देऊन (साच्यातून) बाहेर काढून किंवा ओतकाम करून प्लास्टिकचे निरनिराळ्या घनआकारांमध्ये रूपांतर करण्याची कोणतीही प्रक्रिया किंवा इतर तत्सम काम किंवा अशा प्रक्रियेशी आनुषंगिक असलेले कोणतेही काम करण्यात येते अशा कोणत्याही उद्योगातील रोजगारातील विद्यमान परिस्थितीची पाहणी करण्यासाठी आणि शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग क्रमांक एमडब्ल्यूए. ५७६९/१५५६७८-एलएबी-तीन, दिनांक १८ नोव्हेंबर १९६९ अन्वये उक्त रोजगाराच्या बाबतीत निश्चित करण्यात आलेल्या वेतनाच्या किमान दरामध्ये सुधारणा करण्यासंबंधी शासनाला सल्ला देण्यासाठी पुढील व्यक्तींची एक समिती नेमली होती.

१.२. **समितीचा कर्मचारीवर्ग.**—समितीचे सदस्य म्हणून पुढील व्यक्तींची नेमणूक करण्यात आली होती :—

**अध्यक्ष**

श्री. उमर अब्दुल अझीझ काझी, विधानसभा सदस्य,
एशियन पॅलेस, ३ रा मजला, साकळी स्ट्रीट, तिसरी क्रॉस लेन, भायखळा, मुंबई ४०० ००८.

| मालकांचे प्रतिनिधी | कामगारांचे प्रतिनिधी |
|---|---|
| १. श्री. जे. एम. जयसिंग, अध्यक्ष, स्मॉल स्केल प्लास्टिक मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, ६, तिसरी भोईवाडा गल्ली, भुलेश्वर, मुंबई-२. | १. श्री. पी. एल. माणकर, चिटणीस, पूना लेबर युनियन, ५०३, जुना बाजार, खडकी, पुणे-३. |
| २. श्री. सी. बी. गरवारे, अध्यक्ष, ऑल इंडिया प्लास्टिक मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, द्वारा—गरवारे प्लास्टिक प्रायव्हेट लिमिटेड, १५५, ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-१८. | २. श्री. जी. एम. खांडे, अध्यक्ष, नागपूर लेबर युनियन, वॉर्ड क्रमांक २९, इतवारी, नागपूर-२. |
| ३. श्री. डी. पी. आचार्य, द्वारा—प्रतिभा प्लास्टिक्स इंडस्ट्री, १८-ए-२, बॉबे-पूना रोड, पुणे-५. | ३. श्री. शरद जे. राव, चिटणीस बॉम्बे लेबर युनियन, २०४, राजा राममोहन रॉय रस्ता, मुंबई-४. |
| ४. श्री. हरगोविंद बजाज, व्यवस्थापन संचालक, मेसर्स, बजाज प्लास्टिक लिमिटेड, एमआयडीसी. इंडस्ट्रियल इस्टेट, हिंगणे रस्ता, नागपूर-१६. | ४. श्री. जी. आर. खानोलकर, सरचिटणीस जनरल कामगार युनियन, लाल बावटा, १७, दळवी बिल्डिंग, परळ, मुंबई-१२. |

श्रीमती एस. पी. गायतोंडे, सहायक कामगार आयुक्त, मुंबई यांची समितीच्या सदस्य-सचिव म्हणून नेमणूक करण्यात आली होती. त्याच बरोबर त्यांनी आपल्या पदाची कर्तव्येसुध्दा सांभाळावयाची होती.

१.३. श्री. सी. बी. गरवारे हे ऑल इंडिया प्लास्टिक मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी न राहिल्यामुळे त्यांनी २४ फेब्रुवारी १९७५ रोजी पत्र पाठवून आपल्या जागी नव्यानेच निवडून आलेले अध्यक्ष, प्रभादेवी इंडस्ट्रिअल इस्टेट, ४०२, वीर सावरकर मार्ग, मुंबई-२५ येथील बूलानी इंजिनिअरिंग कॉर्पोरेशनचे श्री. बी. एल. बूलानी यांची मालकांचे प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करावी असे सुचवले होते.

१.४. शासन निर्णय क्रमांक एमडब्ल्यूए.५ ७७४/१०७४०६-एलएबी-तीन-ए, दिनांक ८ एप्रिल १९७५ द्वारे शासनाने बूलानी इंजिनिअरिंग कॉर्पोरेशन, ४०२, वीर सावरकर मार्ग, मुंबई-२५, यांचे श्री. बी. एल. बूलानी यांची समितीतील मालकांचे सदस्य प्रतिनिधी म्हणून नेमणूक केली.

**विचारार्थ विषय**

१.५. शासन निर्णय क्रमांक एमडब्ल्यूए. ५७७४/२०३४७३-एलएबी-तीन-ए, दिनांक ३ फेब्रुवारी १९७५ मध्ये अंतर्भूत असलेले समितीचे विचारार्थ विषय पुढीलप्रमाणे आहेत :—

(अ) ज्या उद्योगामध्ये उष्णतेच्या सहाय्याने आणि किंवा दाब देऊन किंवा दोहोंच्या सहाय्याने साच्यात घालून, आकार देऊन (साच्यातून) बाहेर काढून किंवा ओतकाम करून प्लास्टिकचे निरनिराळया घन आकारांमध्ये रूपांतर करण्याची कोणतीही प्रक्रिया किंवा इतर तत्सम काम किंवा अशा प्रक्रियेशी आनुषंगिक असलेले कोणतेही काम करण्यात येते अशा कोणत्याही उद्योगातील रोजगारातील विद्यमान परिस्थितीची पाहणी करणे, आणि

(ब) शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग क्रमांक एमडब्ल्यूए. ५७६९/१५५६७८-एलएबी-तीन, दिनांक १८ नोव्हेंबर १९६९ अन्वये उक्त रोजगाराच्या बाबतीत निश्चित केलेल्या वेतनाच्या किमान दरांमध्ये सुधारणा करण्यासंबंधी शासनाला सल्ला देणे.

१.६. **अहवाल सादर करण्याचा कालावधी.**—३ फेब्रुवारी १९७५ पासून सहा महिन्यांच्या आत समितीने आपला अहवाल सादर करावयाचा होता. तथापि, काही अडचणीमुळे तिला उक्त मुदतीत आपला अहवाल पूर्ण करून सादर करणे शक्य नव्हते, म्हणून अहवाल सादर करण्याची मुदत ३० जून १९७६ पर्यंत वाढवण्याबाबत समितीने शासनाला विनंती केली आणि शासनाने ती विनंती मान्य केली.

**कार्यपद्धती**

१.७. समितीची पहिली बैठक, मुंबई येथे दिनांक ५ मार्च १९७५ रोजी घेण्यात आली. या बैठकीमध्ये सदस्यांनी परस्पर परिचय करून घेतल्यानंतर समितीकडे सोपवलेल्या कामाची माहिती करून घेतली. समितीने एक संक्षिप्त प्रश्नावली तयार करावी व ती महत्त्वाच्या कामगार संघटना व श्रमिक संघ आणि मालकांचे प्रतिनिधित्व करणारे संघ यांना पाठवावी असे ठरवण्यात आले. त्यासाठी कामगार आयुक्त, मुंबई यांच्या कार्यालयातील काही अन्वेषकांना प्रतिनियुक्त करून प्रश्नावलीचा प्रचार करावा व माहिती गोळा करावी असेही ठरवण्यात आले. त्यानुसार प्रश्नावलीचा मसुदा तयार करण्यात आला आणि समितीच्या नंतरच्या बैठकीत त्याला अंतिम स्वरूप देण्यात आले आणि ती प्रश्नावली श्रमिक संघांच्या सर्व मध्यवर्ती

संघटनांना आणि प्लास्टिक उद्योगाशी संबंधित असलेल्या इतर सर्व संघांना व मालक संघटनांना पाठवण्यात आली. त्याची यादी प्रश्नावलीच्या एका प्रतीसह जोडपत्र 'ड' मध्ये दिली आहे. प्रश्नावलीमध्ये वेतन, कर्मचाऱ्यांची संस्था, मालकांची आर्थिक स्थिती इत्यादीसंबंधीची माहिती अंतर्भूत होती. श्रमिक संघ/संघटना यांच्याकडून जवळजवळ काहीच माहिती मिळाली नाही. तथापि, मालक संघटनांनी त्यांची माहिती पाठविली. तसेच, कामगार आयुक्तांच्या कार्यालयातील अन्वेषकांना प्रतिनियुक्त करून बृहन्मुंबई क्षेत्रामधील सुमारे २०० व्यापारी संस्थांकडूनसुद्धा माहिती गोळा करण्यात आली.

१.८. समितीच्या नियतकालिक बैठकींमध्ये समितीने केलेल्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला आणि पुढील कार्यक्रम आखण्यात आले. समितीकडे सोपवण्यात आलेले काम पूर्ण करण्यासाठी समितीने एकूण १५ बैठकी घेतल्या. या सर्व बैठकी खाली नमूद केलेल्या तारखांना मुंबई येथे घेण्यात आल्या :—

| अनुक्रमांक | दिनांक | अनुक्रमांक | दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | ५ मार्च १९७५. | ९ | २७ मार्च १९७६. |
| २ | २७ मार्च १९७५. | १० | २८ मार्च १९७६. |
| ३ | २३ एप्रिल १९७५. | ११ | २४ मे १९७६. |
| ४ | ४ जुलै १९७५. | १२ | २९ मे १९७६. |
| ५ | १ ऑगस्ट १९७५. | १३ | १४ जून १९७६. |
| ६ | २२ नोव्हेंबर १९७५. | १४ | १८ जून १९७६. |
| ७ | २१ फेब्रुवारी १९७६. | १५ | २५ जून १९७६. |
| ८ | १२ मार्च १९७६. | | |

**समितीच्या दौऱ्यांचा कार्यक्रम**

१.९. प्लास्टिक उद्योगाच्या वस्तुनिर्माण प्रक्रियेचा अभ्यास करण्यासाठी आणि काही कामगारांच्या मुलाखती घेऊन कामाच्या जागीच चौकशी करण्यासाठी समितीने मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक आणि औरंगाबाद या केंद्रांना भेटी दिल्या. समितीने वरील सर्व केंद्रांच्या हितसंबंधीत व्यक्तींनी पुरवलेल्या माहितीची नोंद घेतली. समितीने ज्या विविध केंद्रांना भेटी दिल्या आणि जी माहिती गोळा केली ती प्रसिद्ध करण्यासाठी प्रसिद्धी संचालकांमार्फत प्रसिद्धीपत्रके काढण्यात आली होती. संबंधित व्यापारी संस्था संघ आणि श्रमिक संघ यांनी आपले विचार मांडण्यासाठी समितीपुढे नियत वेळी व नियत ठिकाणी हजर रहावे अशी विनंती त्यांना अगोदरच करण्यात आली होती. समितीला आपल्या दौऱ्यामध्ये कारखान्यांमध्ये केल्या जाणाऱ्या कामाची स्थिती आणि कामगारांनी पार पाडलेल्या कामाचे स्वरूप, तसेच कामगारांना सध्या मिळत असलेले वेतनाचे दर आणि इतर सवलती इत्यादींची पाहणी करण्याची संधी मिळाली.

१.१०. समितीने खालील केंद्रांच्या ठिकाणी जाऊन कामाच्या जागीच चौकशी करण्यासाठी आणि माहिती गोळा करण्यासाठी भेटी दिल्या :—

| अनुक्रमांक | ठिकाण | भेट दिल्याची तारीख | भेट दिलेल्या कारखान्यांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | मुंबई | २३ ऑगस्ट १९७५ | १५ |
| | | २४ जानेवारी १९७६ व २१ फेब्रुवारी १९७६. | १४ |
| २ | पुणे | २५ ऑगस्ट १९७५ | ६ |
| ३ | नागपूर | २३ सप्टेंबर १९७५ | ८ |
| ४ | नाशिक | १९ डिसेंबर १९७५ | ४ |
| ५ | औरंगाबाद | २० डिसेंबर १९७५ | ३ |
| | साक्ष नोंदविण्याकरीता | | |
| १ | मुंबई | २० फेब्रुवारी १९७६. | |
| २ | पुणे | २६ फेब्रुवारी १९७५. | |
| ३ | नागपूर | २४ सप्टेंबर १९७५. | |
| ४ | नाशिक | १९ डिसेंबर १९७५. | |
| ५ | औरंगाबाद | २० डिसेंबर १९७५. | |

१.११. माहिती गोळा करण्यासाठी समितीने ज्या केंद्रांना भेटी दिल्या तेथील माहिती देण्यासाठी खालील कर्मचारी संघ व श्रमिक संघटनांनी आपले प्रतिनिधी पाठवले होते :—

मुंबई .. (१) बॉम्बे स्मॉल स्केल ऑप्टिकल फ्रेम्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, मुंबई.
(२) बॉम्बे फाउंटन पेन मॅन्युफॅक्चरर्स अँड ट्रेडर्स असोशिएशन, मुंबई.
(३) ऑल इंडिया प्लास्टिक मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, मुंबई.
(४) स्मॉल स्केल प्लास्टिक मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, मुंबई.
(५) ऑल इंडिया प्लास्टिक बॅग्ज्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, मुंबई.
(६) ऑल इंडिया प्लॅट टेप मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, मुंबई.
(७) साई पॅकिंग प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई.

पुणे .. (१) स्वस्तिक प्लास्टिक कामगार युनियन.
(२) हिंद मजदुर पंचायत, पुणे.
(३) पूना लेबर युनियन, पुणे.
(४) महाराष्ट्र राज्य श्रमिक संघ.
(५) जनरल इंजिनिअरिंग कामगार संघटना, पुणे.
(६) खोसला ग्रुप कामगार युनियन.
(७) गरवारे नायलॉन (पिंपरी) कामगार संघ, पुणे.
(८) मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँन्ड इंडस्ट्रिज, पुणे.

(९) टेक्नो इंडस्ट्रिज, भोसरी, पुणे.
(१०) खोसला नायलॉन प्रायव्हेट लिमिटेड, पुणे.
(११) स्वस्तिक प्लास्टिक प्रॉडक्ट्स, पुणे.
(१२) सर्व श्रमिक संघटना, पुणे.

नागपूर .. (१) राजेंद्र प्लास्टिक प्रॉडक्ट्स, नागपूर.
(२) महेंद्र इंडस्ट्रिज, नागपूर.
(३) बेदी प्लास्टिक्स लिमिटेड, नागपूर.
(४) बजाज प्लास्टिक्स लिमिटेड, नागपूर.
(५) विदर्भ प्लास्टिक कामगार संघ, नागपूर.
(६) वेव्हिन इंडिया युनियन, नागपूर.
(७) महाराष्ट्र प्लास्टिक कामगार संघ, नागपूर.
(८) अजंठा प्लास्टिक्स, नागपूर.

* * *

## प्रकरण दोन

# उद्योगाचे स्वरूप

**उद्योगाची व्याप्ती**

२.१. हा उद्योग महाराष्ट्र राज्यात मुख्यत्वेकरून बृहन्मुंबई, ठाणे, पुणे, खडकी, कोल्हापूर, वालचंदनगर आणि औरंगाबाद या ठिकाणी चालवला जात आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार कारखाने अधिनियमान्वये राज्यात ४६५ कारखाने नोंदणीकृत आहेत असे कळविण्यात आले असून त्यामध्ये १६,६४७ लोकांना रोजगार मिळतो. यापैकी मुंबईमध्ये कारखान्यांची सर्वात जास्त दाटी झालेली असून तेथे ३५९ कारखाने आहेत व त्यामध्ये १२,६७६ लोक कामास आहेत. याशिवाय, बृहन्मुंबईत दुकाने व व्यापारी संस्था अधिनियमाखाली नोंदणी झालेल्या सुमारे १,१५९ व्यापारी संस्था आहेत व त्यामध्ये ५,७३० माणसे काम करतात. या उद्योगामध्ये लहान कारखान्यांचा अंतर्भाव असला तरी त्यामध्ये काही मोठे कारखानेही असून त्यातील प्रत्येक कारखान्यात ५०० हून अधिक माणसे काम करीत आहेत असे दिसून येईल. प्लॅस्टिकच्या वस्तू तयार करणारे काही कारखाने मध्यम आकाराचे आहेत तर, कारखाने अधिनियमाखाली नोंदणी झालेल्या ६५ टक्के कारखान्यांमध्ये २० पेक्षाही कमी लोक कामावर आहेत. बृहन्मुबईतील कारखाने अधिनियमाखाली नोंदणी झालेल्या कारखान्यांत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या संख्येतील फरक पुढील तक्त्यामध्ये दर्शविला आहे.

**बृहन्मुंबई क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या संख्येनुसार कारखान्यांचे वर्गीकरण**

| वर्ग गट | | | | कारखान्यांची संख्या | एकूण कर्मचारी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १–१० | .. | .. | .. | ९९ | ७३० |
| ११–२० | .. | .. | .. | ११३ | २,२१४ |
| २१–५० | .. | .. | .. | ९८ | २,०५७ |
| ५१ व त्याहून अधिक | | .. | .. | ४९ | ७,६७५ |
| | | | | ३५९ | १२,६७६ |

२.२. कारखाने अधिनियमाखाली नोंदणी झालेले कारखाने, तसेच, दुकाने व व्यापारी संस्था अधिनियमाखाली नोंदणी झालेल्या प्लॅस्टिकच्या वस्तू तयार करणाऱ्या व्यापारी संस्था यांच्याखेरीज प्लॅस्टिकच्या तयार वस्तू बनविणाऱ्या लहान कारखान्यांची संख्या देखील बरीच असून या कारखान्यांची वरीलपैकी कोणत्याही अधिनियमाखाली नोंदणी करण्यात आलेली नाही, हेही येथे नमूद करावे लागेल.

**उद्योगाची जडणघडण**

२.३. भारतामध्ये हा उद्योग १९३० साली सुरू झालेला असला तरी १९६० नंतरच त्याला प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. प्लॅस्टिक म्हणजे रासायनिक तंत्रशास्त्राचा एक चमत्कार

आहे असे मानले जाते. प्लॅस्टिकचा हलकेपणा, चिवटपणा, पारदर्शकता, अर्धपारदर्शकत्व, लवचिकपणा, टणकपणा, क्षरणरोधिता, वीज व उष्णता याना प्रतिबंधक ठरणारे विसंवाहित्व (इन्सुलेशन) यासारखे कित्येक गुणविशेष हे त्याचे कारण आहे. प्लॅस्टिकच्या या सर्व वैशिष्ट्यांमुळे आता लाकडाच्या, धातुच्या, मातीच्या काचेच्या व रबराच्या वस्तूंऐवजी प्लॅस्टिकच्या वस्तूंचा वापर केला जात आहे. सध्या प्लॅस्टिकच्या साधारणपणे २,००० वस्तू बनवल्या जात असून औद्योगिक व घरगुती अशा दोन्ही व्यवहारात त्यांचा वापर करण्यात येतो. इमारतींचे बांधकाम, अभियांत्रिकी, इलेक्ट्रॉनिक्स, आवेष्टनसामग्री, मोटारगाड्या, दूरध्वनी साधने, उद्योग इत्यादींमध्ये प्लॅस्टिकचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. तसेच अनेकप्रकारच्या औद्योगिक, रासायनिक, कृषिविषयक, संरक्षणविषयक सामग्रीच्या निर्मिती मध्येही प्लॅस्टिकचा वापर केला जात आहे. मच्छिमार लोकदेखील प्लॅस्टिकच्या धाग्यापासून बनवलेली जाळी वापरू लागले आहेत आणि परदेशांमध्ये रस्ते तयार करण्यासाठी ज्याप्रमाणे डांबर (बिटुमेन) व कॉंक्रीट यांऐवजी प्लॅस्टिकचा वापर केला जातो तसाच वापर भारतातही करण्यात येईल.

२.४. पूर्वी नमूद केल्याप्रमाणे या उद्योगातील व्यापारी संस्था, मोठ्या मध्यम आणि लहान अशा तीन प्रकारच्या आहेत आणि पुष्कळ ठिकाणी साचेकामाची प्रत्येकी रु. ७०० पेक्षा अधिक किंमत नसलेली एक-दोन यंत्रे बसवून कारखान्याचा मालक व त्याचे कुटुंबीय हे उत्पादनाचे काम करतात. चष्म्याच्या फ्रेम्स, बांगड्या, फाऊंटन पेने यांसारख्या प्लॅस्टिकच्या वस्तू तयार करण्यास फार सोप्या असल्याने त्या ठिकाणी यंत्रांचा फारसा वापर करण्यात येत नाही. याठिकाणी कामगारांना प्राधान्य दिले जाते.

**प्लास्टिक उद्योगातील निर्मिती प्रक्रिया**

२.५. (अ) वापरलेला कच्चा माल देशातील प्लास्टिक प्रक्रिया युनिटे पुढील प्रकारच्या कच्च्या मालाचा वापर करतात :—

(१) थर्मोसेटिंग प्लास्टिक :—फेनॉल फार्मलडीहाइड यांसारखा कच्चा माल, साचेकाम सामग्री, युरिया फार्मलडीहाइड साचेकाम भुकटी, मेलामाईन साचेकाम साधनसामग्री. पॉलिस्टर रेझिन्स इत्यादी.

(२) थर्मोप्लॅस्टिक : पॉलिस्टिरीन, कमी घनता असलेले पॉलिथिसिन अधिक घनता असलेले पालिथिलिन, पीव्हीसी रेझिम सेल्युलोज ऑसिटेट, सेल्युलोज ॲसिटेट, ब्युटिरेट नॉयलॉन, पॉलिकाबोनेट ॲक्रिलिक साचेकाम भुकटी, एबीएस, एसएएन, पीटईई, पालिप्रो विलीन इत्यादी वरील साचेकामविषयक सामग्रीवरोबरच सळया, पत्रे आणि नळया अक्रिलिक, सीएबी, सीएन, पी.व्ही. सी इत्यादींपासून बनवलेले पत्रे, सळया आणि नळया यांचाही वापर पुर्वरचनेच्या कामांकरिता करण्यात येतो.

(ब) **उपयोगात आणलेल्या प्रक्रिया** :—प्लास्टिकच्या वस्तूंच्या निर्मितीकरिता पुढील प्रक्रियांचा वापर गरण्यात येतो :—

(१) दाब साचेकाम किंवा बदल साचेकाम करून,
(२) अंतःक्षेपण साचेकाम करून,
(३) वहिःक्षेपण,
(४) फुंक साचेकाम आणि,
(५) व्हॅक्यूम तयार करून पुर्वरचना निर्मित वस्तू.

२.६. स्विच, सीलिंग, रोझेस, कट आऊट्स, दिव्याच्या शेड्स इ. सारखी विद्युतविषयक सामग्री, बटणे, बाटल्यांची बुचे, कॅबिनेट, नॉब, इत्यादी सारखे रेडिओचे सुटे भाग, दूरध्वनी विषयक साधनसामग्री, घरगुती वापराची भांडी, रक्षापात्रे, टेबल कॅलेंडरे इत्यादींच्या निर्मिती-करिता दाब साचेकाम पद्धतीचा अवलंब करण्यात येतो. अंतःक्षेपण साचेकाम करून तयार केलेल्या वस्तूंमध्य, कंगवे, फळ्या, साबणाच्या डब्या, खेळणी, बांगड्या, फाऊंटन पेने, टूथ ब्रशांची हँडले, बॉल टाईल्स, टेक्सटाईल बॉबिन्स, ध्वनिमुद्रिका, औद्योगिक वापराचे घटकभाग, ट्रँझिस्टर, आणि रेडिओ यांच्या कॅबिनेट इत्यादींचा समावेश होतो.

प्लॅस्टिकचे लहान व मोठे पट्टे, टणक व लवचिक सळया आणि नळया विसंवाहित तारा केबल्स, लवचिक पॉलिथीन लेफलॅट टयुबिंग, अनसपोर्टेड पी.व्ही.सी. पत्रे, पटटया, स्ट्रॅपिंग्ज, पाईप, मोनोफिलॅप टयुबलाईट शेड, डेफ्युजर्स, विणलेल्या पोत्यांसाठी फिती बॉक्स स्ट्रॅपिंग, खुर्चीसाठी वेत, स्त्रियांच्या विणकामासाठी वेत, पार्श्वचित्रे, इत्यादी बहिःक्षेपण प्रक्रियेने तयार करण्यात येतात.

चष्म्याच्या फ्रेम, नाविन्यपूर्ण भेट वस्तू, छत्रीच्या मुठी, पाकिटे, महिलांच्या हँडबॅगा, प्रवासासाठी लागणाऱ्या वस्तू, इत्यादी वस्तू पुर्वरचना पद्धतीने तयार करण्यात येतात. व्हक्यूम तयार करून वस्तुनिर्मिती करण्याच्या पद्धतीद्वारा, जाहिरातींचे फलक रंगीबेरंगी आणि पावसाळी हॅट्स बनावट छते, शोभिवंत टाईल्स, इ. वस्तू बनवण्यात येतात. औषधांच्या आवेष्टनांकरिता व इतर उद्योगांकरिता लागणाऱ्या "स्क्विझ" बाटल्या आणि इतर न फुटणारी खेळणी, फेरीकन्स, इत्यादी वस्तू फुंक साचेकाम पद्धतीने बनवण्यात येतात.

### अलिकडच्या काळात सुरू करण्यात आलेल्या नवीन पद्धती

२.७. समितीने मुंबई, नागपूर, औरंगाबाद या ठिकाणच्या कारखान्यांना भेटी दिल्या त्यावेळी १९६९ मध्ये किमान वेतन अधिनियम अंमलात आल्यापासून प्लॅस्टिक उद्योगामध्ये आणखी काही नवीन कारखाने सुरू करण्यात आले असल्याचे या समितीला आढळून आले. या कारखान्यांमध्ये विणलेली पोती तयार करण्यात येतात त्यामुळे त्यांना विणकामाचे कारखाने असे म्हटले जाते. या ठिकाणी प्लॅस्टिकची पोती तयार करण्याकरिता प्लॅस्टिकच्या धाग्याचे विणकाम करून प्लॅस्टिकचे कापड तयार केले जाते. ही पोती विशेषकरून, रासायनिक खतांसारखी रासायनिक पदार्थाची भुकटी साठवण्याकरिता वापरली जातात. या कामासाठी आतापर्यंत गोणपाटाची पोती वापरण्यात येत असत. परंतु आता त्याची जागा या पद्धतीने बनवलेली ही नवीन पोती घेत आहेत. प्लॅस्टिकपासून बनवलेल्या अधिक चांगल्या प्रकारच्या कापडाचा उपयोग हल्ली पलंगपोस म्हणूनही केला जातो. या प्रक्रियेमध्ये काम करीत असलेले विणकर व मुकादम यांना पूर्वीच्या समितीने वेतनदारांच्या वर्गीकरणात समाविष्ट केलेले नव्हते. परंतु, ही समिती आता प्लॅस्टिक उद्योगातील कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनाबाबत शिफारस करीत असल्यामुळे या दोन्ही वर्गांचा विचार करणे आवश्यक आहे.

### राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत प्लॅस्टिक उद्योगाने घातलेली भर

२.८. अनेक प्रकारच्या अंतर्गत व बाह्य कारणांमुळे १९७४ पासून या उद्योगाची पीछेहाट झालेली असली तरी आजमितीला या उद्योगाने प्रचंड प्रगती केली आहे ही गोष्ट नाकारता येणार नाही. या उद्योगाने नवीन निर्मिती प्रक्रिया शोधून काढल्या असून प्लॅस्टिकच्या विविध वस्तूंचे उत्पादनही बऱ्याच मोठ्या प्रमाणावर वाढविले आहे. त्या वस्तू देशी तसेच परदेशी बाजारपेठांमध्ये विकल्या जात असून त्यामुळे देशाला परकीय चलन मिळत आहे.

२.९. भारतात सध्या जवळ जवळ १,२०,००० टन इतक्या प्लॅस्टिकच्या वस्तूंचे उत्पादन केले जाते असा अंदाज आहे.

निरनिराळ्या प्रक्रिया करणाऱ्या कारखान्यांमध्ये दरवर्षी वापरण्यात येणाऱ्या कच्च्या मालाची सरासरी पुढीलप्रमाणे आहे :—

*प्रक्रिया

| | | | लहान कारखाने | मोठे कारखाने | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | | टन | टन | टन |
| अंत:क्षेपण साचेकाम | .. | .. | २३,५०० | ७,५०० | ३१,००० |
| फुंक साचेकाम | .. | .. | ७,००० | ५०० | ७,५०० |
| फुंक पटटचा (प्लोप फिल्म) | .. | .. | २२,००० | ६,००० | २८,००० |
| केवल | .. | .. | १०,००० | १०,००० | २०,००० |
| विणलेली पोती | .. | .. | १०,००० | ... | १०,००० |
| कॅलेंडरिंग आणि स्प्रेडिंग | .. | .. | ८,००० | २,००० | १०,००० |
| | एकूण | .. | ८०,५०० | २६,००० | १,०६,५०० |

*ऑल इंडिया प्लास्टिक मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन मुंबई, यांनी पुरविलेल्या माहितीनुसार.

२.१०. आता प्लॅस्टिकच्या विविध वस्तूंची मोठया प्रमाणावर निर्यात केली जात आहे या गोष्टीचा येथे आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. या वस्तूंमध्ये पी.व्ही.सी. लेदर क्लॉथ, लायनोलिअम, विद्युत विषयक सुटे भाग, चष्म्याच्या फ्रेम्स, फाऊन्टन पेने, बांगडया, पी.व्ही. सी. पत्रे (शीटींग) इत्यादींचा समावेश आहे. सध्या दरवर्षी जवळ जवळ रु. १८ कोटी रकमेच्या वस्तूंची निर्यात करण्यात येते.

* * *

## प्रकरण तीन

# मालक व त्यांच्या संघटना यांचे विचार
## (ऑल इंडिया प्लास्टिक मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन)

३.१. ऑल इंडिया प्लास्टिक मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या मते इतर उद्योगांच्या मानाने भारतातील प्लास्टिक उद्योग हा एक नवीन उद्योग आहे व भारतात या उद्योगाची प्रगती अनेक कारणांमुळे मंद व तुटक तुटक अशी होत आहे. प्लास्टिकच्या सर्वच कच्च्या मालावरील उत्पादन शुल्कात बेसुमार म्हणजे मूल्यानुसार ३५ टक्क्यांपासून ५६ टक्क्यांपर्यंत वाढ झाली तसेच, पेट्रोकेमिकलपासून मिळणाऱ्या नॅफ्थ्याची किंमतही अचानक दर मेट्रिक टनास ४४५ रुपये होती ती १,००० रुपयांपर्यंत वाढली. त्यामुळे १९७४ च्या सुरुवातीपासूनच प्लास्टिक उद्योगावर अतिशय तीव्र आणि अभूतपूर्व असे संकट कोसळले आहे. याच्या परिणामी प्लास्टिक बनविण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किंमतीसुद्धा १०० टक्क्यां-पेक्षाही अधिक वाढल्या. (तथापि, प्लास्टिक उद्योगाच्या प्रतिनिधीने महाराष्ट्र शासनास सादर केलेल्या अभिवेदनामुळे उत्पादन शुल्क ५६ टक्क्यांवरून कमी करून ४० टक्क्यांवर आणण्यात आले हे आम्ही येथे सहर्ष नमूद करू इच्छितो). कच्च्या मालाच्या या जबर किंमतीमुळे प्लास्टिकच्या तयार मालाची बाजारपेठ खूपच कमी झाली. तसेच प्रक्रिया क्षेत्रातील स्थापित क्षमतेपैकी जवळजवळ ५० टक्के क्षमता ही सध्या निष्क्रिय आहे असे आपल्या पाहणीवरून आढळून आल्याचेही त्या असोसिएशनने निदर्शनास आणून दिले. देशातील आर्थिक मंदीच्या लाटेमुळे ही परिस्थिती आणखीनच खालावली आहे. शिवाय प्लास्टिक उद्योग हा ग्राहकाभिमुख व सेवा उद्योग आहे. वाढीव वेतन किंवा सुखसोयी यांच्या स्वरूपात आणखी कोणताही जादा भार त्यावर पडल्यास त्याचा तयार मालाच्या विक्रीच्या किंमतीवर निश्चित परिणाम होईल असे या असोसिएशनचे मत आहे.

३.२. कच्च्या मालावर असलेल्या ४० टक्के उत्पादन शुल्काव्यतिरिक्त महाराष्ट्र शासन, तयार मालावर ८ ते ११ टक्क्यांपर्यंत विक्रीकर वसूल करते. हे सर्व वित्तीय भार सोसून महाराष्ट्र राज्यात तयार झालेल्या मालाला, ज्या राज्यात कोणताही विक्रीकर आकारला जात नाही अशा इतर राज्यांच्या तशाच मालाशी स्पर्धा करावी लागते. तसेच जेथे इतक्या मोठ्या दराने विक्रीकर आकारला जात नाही अशा तामीळनाडू व म्हैसूर यांसारख्या इतर राज्यातील मालाशीही या उद्योगाला टक्कर द्यावी लागते. या असोसिएशनने असेही दाखवून दिले की, महाराष्ट्र राज्यातील प्लास्टिक कारखानदारांना ज्या राज्यात प्लास्टिक उद्योगावर इतके मोठे कर बसवलेले नाहीत अशा इतर राज्यांबरोबरच्या तीव्र स्पर्धेत उतरावे लागते. तसेच प्लास्टिक उद्योगातील कामगारांना वेतनाव्यतिरिक्त कामगार भविष्यनिर्वाह निधी, राज्य कामगार विमा योजना, बोनस व उपदान यांसारखे आनुषंगिक लाभ देखील मिळत आहेत असेही मत होते.

३.३. असोसिएशनने असेही निदर्शनास आणून दिले की, प्लास्टिक प्रक्रिया उद्योग हा एक कामगार प्रधान उद्योग आहे आणि लघु उद्योग किंवा कुटीरोद्योग तत्वावर चालणाऱ्या कारखान्यांसाठी हा उद्योग विशेषेकरून योग्य आहे. या प्लास्टिक कारखान्यांपैकी अधिकांश कारखाने, बृहन्मुंबई, नागपूर, पुणे, वालचंदनगर, खडकी इत्यादी ठिकाणी आहेत. लघु उद्योग

क्षेत्रातील कारखाना चालविणाऱ्या मालकांची या धंद्यावर जेमतेम गुजराण होते. विजेचे दर वाढल्यामुळे त्या वाढलेल्या खर्चाचा बोजाही मालकांना सोसावा लागत आहे व त्यामुळे उत्पादनाचा खर्चही वाढला आहे.

३.४. म्हणून किमान वेतन दरात सुधारणा करताना उद्योगाची वर नमूद केलेली स्थिती विचारात घ्यावी असे असोसिएशनने सुचविले आहे. पूर्वी निश्चित केलेल्या किमान वेतन दरानंतर, राहणी खर्च बराच वाढलेला आहे हे असोसिएशनने मान्य केले आहे. तथापि, महाराष्ट्र राज्याच्या व प्लास्टिक उद्योगाच्या वर निर्दिष्ट केलेल्या अडचणी लक्षात घेता, अकुशल कामगारांच्या संबंधात सध्याच्या किमान वेतन दरात ३० टक्क्यांनी वाढ करणे न्याय्य ठरेल असे या असोसिएशनला वाटते.

**स्मॉल स्केल प्लास्टिक मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन**

३.५. स्मॉल स्केल प्लास्टिक मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या वतीने असे प्रतिपादन करण्यात आले की, हा उद्योग अजूनही शैशवावस्थेत असून तो बहुतांशी लघु उद्योग किंवा कुटीरोद्योग म्हणूनच चालवला जातो. त्यांच्या अंदाजानुसार ४० ते ५० टक्के कारखाने हे बृहन्मुंबईत आहेत व अगदी थोडे कारखाने पुणे, नागपूर, सोलापूर इत्यादी ठिकाणी आहेत. लघु उद्योग कारखान्यांच्या व्यवस्थापनामध्ये मालक स्वतः आपल्या कुटुंबियांच्या मदतीने काम करतो व तशाच स्वरूपाच्या कामासाठी किंवा मालाचे पॅकिंग करण्याच्या कामासाठी बाहेरील फार थोडे लोक कामावर लावतो. मालक हा स्वतःच व्यवस्थापक, कामगार, हिशेबनीस इत्यादी सर्व कामे करतो.

३.६. नॅफ्थ्याच्या किमतीत दर मेट्रिक टनाला ४४५ रु. वरून १००० रुपये इतकी वाढ झाल्याच्या परिणामी देशात तयार होणाऱ्या कच्च्या मालाच्या किमतीत वाढ झाल्यामुळे या उद्योगाची प्रगती फार संथ गतीने होत आहे असे या असोसिएशनचे मत आहे.

३.७. ज्या अनिश्चित अशा परिस्थितीतून सध्या हा उद्योग वाटचाल करीत आहे ती लक्षात घेता उपभोक्ता किंमत निर्देशांकाशी सांगड घातलेल्या विशेष भत्त्यासह वाढीव किमान वेतन दराच्या रूपाने अनिश्चिततेत आणखी भर घालणे उचित ठरणार नाही असे असोसिएशनचे मत आहे. यामुळे या उद्योगातील अडचणी आणखी वाढतील व म्हणून विद्यमान किमान वेतन दर समितीने या अडचणी लक्षात घ्याव्यात व विद्यमान वेतन दराच्या २५ टक्क्यांपेक्षा अधिक होणार नाही अशा रीतीने किमान वेतन दर निश्चित करावेत आणि त्याची उपभोक्ता किंमत निर्देशांकाशी सांगड घालण्यात येऊ नये, अशी सूचना करण्यात आली आहे.

**लघु उद्योग म्हणून चष्म्यांच्या फ्रेमचे उत्पादन करणाऱ्या उत्पादकांचा संघ**

३.८. लघु उद्योग म्हणून चष्म्यांच्या फ्रेमचे उत्पादन करणाऱ्या उत्पादकांच्या संघाच्या वतीने असे मत व्यक्त करण्यात आले की, चष्म्यांच्या फ्रेम तयार करण्याचे काम हा एक स्वतंत्र 'हस्तव्यवसाय' असून या कामाला कोणतेही कौशल्य लागत नाही तसेच त्यातील फारच थोडे काम यंत्राने करावयाचे असते. हा लघु उद्योग असून संघाच्या मते त्याचे वर्गीकरण प्लास्टिक उद्योग म्हणून करण्यात आले असले तरी, यासाठी वापरण्यात येणारा कच्चा माल हा प्लास्टिक वस्तूंच्या उत्पादनासाठी वापरल्या जाणाऱ्या कच्च्या मालापेक्षा फारच वेगळा असतो. तसेच, या उद्योगातील कामे व नोकरीचे स्वरूप देखील भिन्न आहे.

म्हणून संघाचे म्हणणे असे होते की, किमान वेतन अधिनियमानुसार महाराष्ट्रातील प्लास्टिक माल उद्योगास लागू असलेले वेतनाचे नवीन दर हे चष्म्यांच्या फ्रेमचे उत्पादन करणाऱ्या उद्योगांना लागू करण्यात आले तर, गुजरात, दिल्ली, इत्यादी राज्यात असा वेतनविषयक कायदा नसल्यामुळे त्या राज्यातील उद्योगाच्या तुलनेने महाराष्ट्र राज्यातील विशेषत: मुंबईतील कारखान्याचे मोठ्या प्रमाणावर अहित होईल. दर्जेदार मालाचे उत्पादन आणि अधिक चांगल्या व कार्यक्षम व्यवस्थापनावर भर यांमुळे सध्या तरी या उद्योगाला आपली अनुकुल स्थिती कायम राखणे शक्य झाले आहे. वरील स्थिती लक्षात घेऊन संघाने असे मत व्यक्त केले की, संघाच्या सदस्यांवर किमान वेतन अधिनियमाखाली जादा वेतनाच्या रूपाने जास्तीचा बोजा टाकण्यात आला तर त्यामुळे या उद्योगाचा सर्वनाश ओढवेल.

**मुंबई फाऊंटन पेन उत्पादक व ' व्यापारी ' संघ**

३.९. मुंबई फाऊंटन पेन उत्पादक व व्यापारी संघ यांच्या वतीने अशी विनंती करण्यात आली की, प्लास्टिक उद्योगाकरिता किमान वेतनाचे दर निश्चित करण्यापूर्वी पुढील मुद्दे विचारात घेण्यात यावेत. मात्र फाऊंटन पेन उद्योगासाठी किमान वेतनाचे दर निश्चित करण्यासाठी एक स्वतंत्र समितीच नेमण्यात यावी, या आमच्या म्हणण्यास यापुढे बाध येऊ नये,—

(अ) या उद्योगात प्रामुख्याने सी. ए. बी. साचेकाम, भुकटी, स्टेनलेस स्टीलचे पत्रे, पेन पॉइंट, इत्यादींसारखा कच्चा माल वापरण्यात येतो. त्यांच्या मते कच्च्या मालाची किंमत १०० टक्क्यांहून अधिक वाढली आहे. फाऊंटन पेन किंवा बॉल पेन हे या उद्योगातील अंतीम उत्पादन असून या बाबींच्या किंमतीत झालेली वाढ ही ग्राहकांवरही टाकता येत नाही किंवा उद्योगात सध्या मिळणाऱ्या तुटपुंज्या नफ्यामधूनही ती भागवता येत नाही. त्याच्या परिणामी, त्यांची यंत्रसामुग्री निष्क्रिय राहते.

(ब) हा एक कामगार प्रधान उद्योग आहे. त्यामुळे या कामगारांच्या रोजंदारीत अगदी अल्पशी वाढ केली तरी उत्पादनाच्या खर्चावर तिचा परिणाम झाल्याखेरीज रहात नाही. या उद्योगातील सर्व कारखान्यांच्या बाबतीत मजुरी बहुतेक तयार वस्तूंच्या एकूण किंमतीच्या ५० टक्के इतकी असते.

(क) फाऊंटन पेन किंवा बॉल पेन यांचा वापर मुख्यत: विद्यार्थी वर्गाकडून होतो आणि रोजंदारीचा किमान दर निश्चित करण्यापूर्वी समितीने ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, कारण या उद्योगातील रोजंदारीत कोणतीही वाढ केल्यास कारखानदारांना एकतर आपले कारखाने बंद करावे लागतील किंवा ग्राहकांवर त्याचा बोजा टाकणे भाग पडेल.

(ड) फाऊंटन पेन उत्पादनाचा उद्योग पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, दिल्ली यांसारख्या इतर राज्यांतही विकसित झाला आहे. महाराष्ट्रातील कारखान्यांना इतर राज्यांतील विशेषत: पश्चिम बंगालमधील कारखान्यांशी सतत स्पर्धा करावी लागते कारण पश्चिम बंगालमधील बहुसंख्य कारखाने हे कुटीरोद्योगाच्या स्वरूपाचे आहेत. साचेकाम कारखाना सुरू करण्याकरिता लागणाऱ्या एका साचेकाम यंत्राची बफ यंत्रासह किंमत ७०० रुपयांच्या आसपास आहे. या यंत्रासाठी फारच कमी भांडवल गुंतवावे लागत असल्यामुळे ती मालकाच्या/कामगारांच्या लहानशा घरातही बसवलेली आहेत. म्हणून भारतात फाऊंटन पेन उद्योगाचे प्रवर्तक असलेल्या महाराष्ट्र राज्यातील कारखान्यांना या राज्यातील सध्याच्या उच्च मजुरीमुळे घातक स्पर्धेला तोंड द्यावे लागते.

(इ) त्यांच्या मते किमान वेतनाच्या दरांची उपभोक्ता किंमत निर्देशांकाशी सांगड घालण्यात येऊ नये.

(फ) सध्याची वर्गवारीच ठेवण्यात यावी असे मत संघाने व्यक्त केले आहे. संघाने आणखी असेही दाखवून दिले आहे की, फाऊंटन पेन व बॉल पॉइंट पेने तयार करण्यासाठी लागणारी निबे, टोपणे, क्लिपा, फीडर्स इत्यादी सारखे आवश्यक असलेले सुटे भाग हे काही वेळा जेथे साचेकाम सुद्धा केले जाते अशा कारखान्यांत तयार केले जातात तर इतर काही कारखान्यात हे काम कोणत्याही प्रकारे प्लास्टिक साचेकाम न करता स्वतंत्रपणे केले जाते. म्हणून संघाने असे सुचवले आहे की, ज्या कारखान्यांमध्ये केवळ फाऊंटन पेन व बॉल पेन यासाठी लागणारे सुटे भाग तयार केले जातात अशा कारखान्यांना प्लास्टिक उद्योगाकरिता असलेले किमान वेतन दर लागू करण्यापासून नेमकी सूट दिली जावी अन्यथा, पेन व बॉलपेन तयार करणाऱ्या कारखान्यांना लागणारे सुटे भाग तयार करीत असलेल्या कारखान्यांचे वर्गीकरण अनुसूचित रोजगाराखाली केले जाईल व त्यायोगे त्यांच्यावर अन्याय होईल.

३.१०. विभागांच्या संबंधात त्यांनी असे सुचवले आहे की, वेगवेगळ्या विभागातील वेतनामध्ये अधिक फरक असावयास पाहिजे आणि अशा भिन्न वेतन दरांबाबत शिफारस राहणीखर्च, कारखाने ज्या ठिकाणी आहेत ती, स्थाने, इत्यादी गोष्टी विचारात घेतल्यानंतरच करण्यात यावी.

### ऑल इंडिया प्लॅट टेप मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन

३.११. ऑल इंडिया प्लॅट टेप मॅन्युफॅक्चर्स असोसिएशनने असे निवेदन केले की, जाड पॉलिथिनच्या विणकामाचा कारखाना हा त्यामानाने अगदी नवीन उद्योग असून तो कर्नाटकमध्ये १९६९ साली सुरू करण्यात आला आणि महाराष्ट्रात अशा थैल्यांचे व्यापारी उत्पादन १९७१ मध्ये सुरू झाले. देशात एच. डी. पी. ई. जाड पॉलिथीनच्या थैल्यांच्या उत्पादनाचे ११५ कारखाने असून त्यापैकी २४ कारखाने महाराष्ट्रात आहेत. ११५ कारखान्यांपैकी ११४ कारखाने लघुउद्योग क्षेत्रातील आहेत. प्रत्येक कारखान्याच्या भांडवली खर्च ११ ते १२ लाख रुपये इतका आहे आणि त्यातील बहुतेक कारखान्यांना बँकांकडून कर्ज मिळाले आहे.

३.१२. या कारखान्यांतील एकेरी पाळी चालवण्यासाठीसुद्धा सुमारे ३० माणसांची आवश्यकता असते त्यामुळे त्यांच्या मते ही प्रक्रिया कामगार अभिमुख आहे. म्हणून, उत्पादनाचा किमान खर्च दर टनाला रु. ६,५०० एवढा येतो. याउलट इतर प्लास्टिक कारखान्यांमधील हा खर्च दर टनाला साधारणपणे २,००० ते २,५०० रुपयांपर्यंत येतो. या उद्योगाला कच्च्या मालाच्या तुटवड्याच्या प्रश्नालाही तोंड द्यावे लागत आहे. तसेच तागांच्या पोत्यांच्या उत्पादनात खर्चाच्या मानाने या थैल्यांचा उत्पादन खर्च जास्त असल्यामुळे विक्रीच्या प्रश्नालाही या उद्योगाला तोंड द्यावे लागते. उदा. जाड पॉलिथीनच्या ग्रॅन्युअल्स या कच्च्या मालाची किंमत जानेवारी १९७४ मध्ये दर टनाला रु. ७,३३४ एवढी होती. ती जानेवारी १९७५ मध्ये रु. १३,६८९ पर्यंत वाढली. (त्यानंतर उत्पादन शुल्क कमी करून ती रु. ११,६०० पर्यंत कमी करण्यात आली). तसेच जाड पॉलिथीनच्या ग्रॅन्युअल्सवरील उत्पादन शुल्क जानेवारी १९७२ मध्ये दर टनाला रु. १,८१६ वरून रु. ४,५९९ पर्यंत वाढले (आता उत्पादन शुल्काचे दर कमी केल्यामुळे ते काही प्रमाणात कमी करण्यात आले आहे) उत्पादन शुल्कात २५० टक्के व कच्च्या मालाच्या एकूण किंमतीत १०० टक्के एवढी वाढ झाल्यामुळे या उद्योगाला अस्तित्वाचाच प्रश्न भेडसावीत आहे.

३.१३. या उलट अलिकडेच काही काळापूर्वी तागाच्या किमती एकदम गडगडल्या आहेत आणि प्रमाण आकाराची तागाची पोती स्वस्त दरात मिळू लागली आहेत. याच्या परिणामी पुष्कळशा प्लास्टिक कारखान्यांनी मागणी नसल्याने आपल्या क्षमतेपेक्षा कमी उत्पादन घेणे सुरू केले आहे. जाड पॉलिथिनची स्थानिक किमत दर टनास रु. ११,६०० एवढी असून त्याची आंतरराष्ट्रीय किमत रु. ५,५०० च्या आसपास असल्यामुळे इतर देशांनी सांगितलेली किमत अतिशय कमी असते. त्यामुळे या मालाला निर्यातीकरिता अतिशय चांगली मागणी असूनसुद्धा त्यांना निर्यात प्रचालन योजनांमध्ये भाग घेता येत नाही. म्हणून किमान वेतन दर निश्चित करण्यापूर्वी त्यांच्या वरील अडचणींचा विचार व्हावा अशी असोसिएशनने विनंती केली आहे. त्यांच्या मते या अशा प्रकारच्या कारखान्यांमधील कामगारांना अकुशल संवर्गासाठी रु. ५·२५ आणि कुशल संवर्गासाठी रु. १० याप्रमाणे यापूर्वीच सरासरी रोजमजुरी देण्यात येत आहे.

**अखिल भारतीय प्लास्टिक बांगडी उत्पादक संघ**

३·१४ अखिल भारतीय प्लास्टिक बांगडी उत्पादक संघाच्या वतीने असे निवेदन करण्यात आले की, या प्लास्टिक उद्योगाची सुरुवात महाराष्ट्र राज्यातच प्रथम झाली असून तो महाराष्ट्रातच भरभराटीस आला आहे. त्यातील जवळ जवळ ८० टक्के उत्पादन महाराष्ट्र राज्यात होते, आणि या उद्योगात सुमारे १०,००० कामगार काम करीत आहेत. अर्ध-कुशल व कुशल कामगारांनी करावयाची फारच थोडी कामे वगळल्यास अकुशल कामगार नाही करता येईल असेच या कामाचे स्वरूप आहे असे या संघाचे मत आहे. म्हणून सध्याचे वेतन दर अकुशल कामगारांच्या बाबतीत १५ टक्क्यांनी, अर्ध-कुशल कामगारांच्या बाबतीत १० टक्क्यांनी आणि कुशल कामगारांच्या बाबतीत ५ टक्क्यांनी वाढवावे अशी त्या संघाची सूचना आहे, त्यांचे मत विचारात घेऊन महाराष्ट्र शासनाने त्यांना विक्री, कर व उत्पादन शुल्क यांपासून सूट दिली आहे.

**मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स, पुणे**

३.१५. मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज तर्फे असे निवेदन करण्यात आले की, उद्योगातील घडामोडी लक्षात घेता या राज्यातील उद्योगामधील जे किमान वेतनाचे दर सुधारावयाचे आहेत त व इतर राज्यातील विद्यमान किमान वेतन दर यांच्यामधील विसंगती आणि मालकांचे तसेच कर्मचाऱ्यांचेही हितसंबंध विचारात घेऊन संघाने असे सुचवले आहे की कामगारांना सध्या मिळत असलेले सर्वसमावेशक किमान वेतन दर अकुशल कामगारांकरिता दररोज रु. ५ तर अर्ध-कुशल कामगारांकरिता दररोज रु. ५·५० पर्यंत वाढवावेत.

३.१६. लोकसंख्येच्या आधारे योग्य विभाग पाडण्यात यावेत. मुंबई आणि ठाणे यांसारख्या शहरांची तुलना राज्यातील इतर भागाबरोबर करण्यात येऊ नये आणि या विभागांचा आर्थिक विकास अधिक झालेला आहे या आधारावर काही भेददर्शी वेतन देणे उचित ठरेल.

**पुणे येथील मालक**

३.१७. पुणे येथील काही मालकांचे मत मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्सने केलेल्या सूचनांप्रमाणेच होते. त्यांनी २५ ते ३० टक्क्यांपर्यंत वेतनवाढ सुचवली आहे.

### नागपूर येथील मालक

३.१८. नागपूर येथील मालकांनी असे प्रतिपादन केले की, प्लास्टिक उद्योग भारतात सर्वत्रच डबघाईला आला आहे आणि त्यापैकी काही कारखान्यांचे उत्पादन अत्यंत कमी करण्यात आले आहे तर काही कारखाने बंद करण्यात आले आहेत. या उद्योगाच्या सर्वसाधारण ऱ्हासाचे मुख्य कारण म्हणजे या कारखान्याला लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किमती फारच वाढल्या आहेत. १९७३ च्या किमतीशी तुलना करता त्या १०० टक्क्यांनी वाढलेल्या आहेत. या वाढीपैकी बराचसा भाग उत्पादन शुल्काच्या रूपाने घेतला जातो. हे उत्पादनशुल्क १९७३ शी तुलना करता २०० टक्क्यांनी वाढले आहे. मोफ्युसाईल क्षेत्रांमध्ये या उद्योगास ज्या परिस्थितीस तोंड द्यावे लागत आहे ती पुढे नमूद केलेली परिस्थिती विचारात घेण्याचीही त्यांनी समितीस विनंती केली आहे :—

(१) कच्चा माल आणि भांडार वस्तू वेळेवर उपलब्ध होत नसल्यामुळे मालाच्या यादीवरच करावा लागणारा वाढीव खर्च.

(२) वाहतूक खर्चामुळे कच्च्या मालावरील वाढीव खर्च.

(३) जकातीपोटी जादा रक्कम भरणे.

(४) जवळच्या बाजारपेठेत मागणीचा अभाव.

वेतनाच्या किमान दरांमध्ये सुधारणा करण्यापूर्वी पुढील मुद्यांवर योग्य तो विचार करण्यात यावा असे त्यानी सुचवले आहे :—

(१) कामगारांची अपुरी कार्यक्षमता, अल्प-उत्पादनक्षमता यांमुळे मजूरीवर होणारा कारखानानिहाय जादा खर्च.

(२) वेतनात कोणतीही जादा वाढ करण्यात आल्यास तिची उत्पादनक्षमतेशी निश्चित सांगड घालण्यात यावी.

(३) किमान वेतन हे पाळीच्या आधारे न देता कामाच्या तासांच्या आधारे देण्यात यावे.

### औरंगाबाद येथील मालक

३.१९. औरंगाबाद येथील मालकांनी असे निदर्शनास आणून दिले की, कच्च्या मालाच्या किमतीत झालेली बेसुमार वाढ, कच्चा माल उपलब्ध न होण आणि त्याच्या पुरवठ्याबाबत अनिश्चितता व वीज टंचाई हे या उद्योगाच्या वाढीतील प्रमुख अडथळे आहेत. या उद्योगातील अनिश्चिततेची परिस्थिती लक्षात घेऊन समिती जी कोणती वेतनवाढ सुचवील ती उपभोक्ता किंमत निर्देशांकाशी सांगड न घालता एकत्रितच असावी असे मालकांनी सुचवले आहे.

### विविध मतांचा सारांश

३.२०. मालकांच्या निरनिराळ्या संघटनांनी समितीकडे केलेल्या प्रतिवेदनांचा मतितार्थ हा की, मागील काही वर्षांत या उद्योगाने बरीच प्रगती केली असली तरी, त्याचा अर्थ असा नव्हे की, त्याच्या प्रगतीच्या मार्गात त्याला कोणत्याही अडचणींना तोंड द्यावे लागले नाही. या उद्योगाच्या मार्गात आणले गेलेले काही अथडळे दूर सारण्यात आले असते तर कदाचित हा उद्योग अधिक उत्साहप्रद स्थितीत दिसला असता. तांत्रिक अडचणीमुळे किंवा वीज टंचाईमुळे किंवा इतर कोणत्या तरी कारणांमुळे युनियन कार्बाइड अल्कली अँड केमिकल्स कॉर्पोरेशन इंडिया, लिमिटेड, पॉलिकेम इंडस्ट्रिज, पालिओलेफाईन्स इंडिया लिमिटेड, नोसिल;

पी. आर. सी., हिंदुस्तान पोलिमर्स, लिमिटेड, श्रीराम केमिकल्स, कॅलिको केमिकल्स, केमिकल्स अँड फायबर्स इत्यादींसारख्या प्रमुख उत्पादकांकडून प्लास्टिक उद्योगाच्या मागण्यांच्या संबंधात कच्च्या मालाचा पुरेसा पुरवठा होत नसल्यामुळे किंवा देशात उत्पन्न होणारा कच्चा माल मिळत नसल्याने देशी मालाचा तुटवडा ही या उद्योगापुढील सर्वात मोठी समस्या आहे. दुसरी गोष्ट म्हणजे प्लास्टिकच्या वस्तू तयार करण्यासाठी आवश्यक असलेला आयात केलेला कच्चा माल या उद्योगधंद्यात वेळेवर, पुरेसा व रास्त किंमतीस उपलब्ध करून देण्यात आला नाही. वस्तुत: तेलाच्या तीव्र तुटवड्यामुळे आंतर राष्ट्रीय बाजारपेठेतील या कच्च्या मालाच्या किंमती फारच जास्त होत्या. आणखी असे की, या कच्च्या मालावरील आयात शुल्क इतके जबर आहे की, भारतातील उद्योग हा माल आयात करू शकत नाहीत. तिसरे असे की; प्लास्टिक उद्योगावर उत्पादन शुल्काचा बोजा देखील बराच जास्त आहे. १९७६–७७ च्या अर्थसंकल्पामध्ये शासनाने प्लास्टिक उद्योगास उत्पादन शुल्कापासून सूट दिली आहे हे खरे असले तरी १९७४ च्या सुरुवातीपासून या उद्योगास ज्या आपत्तीचा सामना करावा लागत आहे. त्या आपत्तीवर मात करण्याच्या दृष्टीने साहाय्य कितपत उपयुक्त ठरेल हे आजच अजमावणे कठीण आहे. चौथी गोष्ट म्हणजे महाराष्ट्र राज्यातील जबर वीज कपात आणि पतरोध (क्रेडिट स्क्वीझ) यामुळे बाजारविषयक परिस्थितीवर प्रतिकूल परिणाम झाला आहे व त्यामुळेही या उद्योगाची पीछेहाट झाली आहे. अर्थव्यवस्थेतील सर्वसाधारण मंदीच्या परिस्थितीमुळेही प्लास्टिक उद्योगाच्या वाढीवर व प्रगतीवर बऱ्याच जास्त प्रमाणात विपरीत परिणाम झाला आहे.

* * *

# प्रकरण चार

## कामगारांच्या प्रतिनिधींचे विचार

४.१. भारतीय समाजाच्या औद्योगिक जडणघडणीत प्लॅस्टिक उद्योगाने अतिशय महत्त्वाचे स्थान पटकावले आहे. दैनंदिन जीवनात प्लॅस्टिकच्या वस्तूंचा वापर करण्यात येत असल्याने या उद्योगात पूर्वीच जम बसलेल्या कारखान्यांची सर्वांगीण प्रगती होत आहे. हे कारखाने मोठ्या प्रमाणावर वस्तूंची निर्मिती करून त्या वस्तू तितक्याच अधिक किमतींना विकत आहेत व आपल्या नफ्यात अधिकाधिक भरच घालत आहेत. हा उद्योग इतका किफायतशीर असून देखील या उद्योगातील कामगारांना न्याय मिळू शकला नाही. त्यांचे वेतन फारच कमी आहे, आणि या कामगारांच्या कामाच्या बहुतेक सर्वच प्रक्रियांत यंत्राचा वापर करावा लागतो. व ती कुशलतेने चालवण्याचे काम हे अभियांत्रिकी उद्योगातील कामांसारखे आहे, तरीदेखील त्यांना इतके कमी वेतन देण्यात येते. कामगारांना केवळ स्वतःचे डोके वापरूनच नव्हे तर, आपली ताकद व हात यांचा इतक्या कौशल्याने वापर करावा लागतो की, त्यांच्या या कौशल्यातूनच प्लस्टिकच्या आकर्षक वस्तू तयार होऊन बाजारात विक्रीस येत असतात. प्लॅस्टिक उद्योगातील अशा कुशल कामगारांना मिळणारे रु. ९१, रु. ९६ व रु. १०४ हे वेतन इतके क्षुद्र आहे की, केवळ अभियांत्रिकी उद्योगातील कामगारांनाच नव्हे तर, प्लॅस्टिक उद्योगाच्या जवळपासच्या लहान सहान किराणामाल दुकानातील कामगारांनासुद्धा याहून जास्त वेतन मिळते, ही स्थिती दयनीयच आहे.

४.२. म्हणूनच, प्लॅस्टिक उद्योगात काम करणाऱ्या कामगारांना स्वतःच्या कामात जे, कौशल्य, कार्यक्षमता व शारीरिक बळ वापरावे लागते, त्याच्याशी अनुरूप असे पुरेसे वेतन त्याला देण्यात यावे अशी मागणी कामगार संघ करीत असले तर ती अस्थायी ठरू नये.

४.३. कामगार संघाच्या काही प्रतिनिधींनी असे संयुक्तिक निवेदन केले आहे की, प्लॅस्टिक उद्योगातील काही प्रक्रियांचे वस्त्रनिर्माण उद्योगातील प्रक्रियांशी बरेच साम्य आहे आणि म्हणून, प्लॅस्टिक उद्योगामध्ये निश्चित करावयाचे किमान वेतन आणि वस्त्रनिर्माण वेतन मंडळाने विहित केलेले वेतन यांमध्ये काही प्रमाणात तरी संगती असावी. कामगार संघाचे असेही मत आहे की, आजच्या बऱ्याचशा रोजगारात जे वेतन निश्चित करण्यात आले त्यामध्ये त्यामुळे कामगारांना आपल्या मूलभूत गरजेच्या जीवनावश्यक वस्तुसुद्धा त्यातून खरेदी करता येत नाहीत या मूळ गोष्टीकडे कानाडोळा करण्यात आला आहे. आणि म्हणूनच प्लॅस्टिक उद्योगातील कामगारांसाठी जे किमान वेतन निश्चित करण्यात येईल त्यायोगे कामगारांना निदान आपल्या जीवनावश्यक गरजा तरी भागवण्यास मदत होईल असे ते असले पाहिजे.

४.४. संघांनी असेही निदर्शनास आणून दिले की, संघटित उद्योगातील ९९ टक्के प्रक्रिया ह्या स्वयंचलित असतात व ही प्रक्रिया व्यवस्थितपणे घडत आहे, त्यात पोकळी राहात नाही किंवा गळती होत नाही. हे पाहण्यासाठी व दुसऱ्या बाजुने ग्रॅन्युअल ओतण्यासाठी हाताने काम करावे लागते. लहान प्लॅस्टिक कारखान्यांतही प्रक्रियांचे स्वरूप तसेच असते, मात्र तेथे यंत्रे हातानेच चालवतात व त्यातील उत्पादने मर्यादित स्वरुपाची असतात. संघाने असेही

निदर्शनास आणून दिले की, रु. ३.६० हा किमान वेतन दर १९६९ मध्ये निश्चित करण्यात आला होता. तेव्हापासून निर्देशांक किती तरी वाढला व त्यामुळे वेतन दरात वाढ झाली पाहिजे असे कामगारांना वाटणे साहजिकच आहे. आणखी असेही दाखवून देण्यात आले की, किमान वेतन दरात मागील ७ वर्षांत सुधारणा झालेली नाही. दुकान व व्यापारी संस्थांच्या बाबतीत ९० रुपये या किमान वेतन दरात सुधारणा करण्यात येऊन तो रु. १२० इतका वाढवण्यात आला व या किमान वेतनाची उपभोक्ता किंमत निर्देशांकाशी, तसेच रु. ९१·५० या सध्या देय असलेल्या महागाई भत्त्याशी किंवा सध्या दिले जाणारे एकूण वेतन रु. २११·५० याबरोबर सांगड घालण्यात आली. रुग्णालय उद्योग हा तोटयात चालणारा उद्योग समजला जातो. या उद्योगाच्या बाबतीत महाराष्ट्र शासनाने ठरवून दिलेल्या वेतनाची १३७ या ग्राहक मूल्य निर्देशांकाशी सांगड घालण्यात आली व प्रत्येक २ बिंदुसाठी २ रु. याप्रमाणे निर्देशांकात सुधारणा करण्यात आली. यामुळे अकुशल कामगाराला जवळजवळ १२० रुपये एकूण प्रमाण वेतन मिळते. महागाई भत्त्याच्या रुपाने १४४ रुपये व घरभाडे भत्ता म्हणून ८ रुपये मिळतात. रुग्णालय उद्योगाच्या संबंधात समाविष्ट करण्यात आलेला घरभाडे भत्ता इतर कोणत्याही किमान वेतन दरात आढळत नाही. असेही निदर्शनास आणून देण्यात आले की, अभियांत्रिकी उद्योगात देखील रु. ८·५० ला किमान वेतन दर निश्चित करण्यात आला आहे. तसेच, निदर्शांक ३०१ असताना १·६७ पैसे विशेष भत्ता देण्याची तरतूद निर्देशांकाशी सांगड घालण्यामुळे झाली आहे. यामुळे एकूण वेतन २६० रुपयांच्या वर जाते.

४.५. वरील पार्श्वभूमी लक्षात घेऊन, संघाने किमान वेतन निश्चित करण्यासाठी एक प्रमाणपद्धती सादर केली आहे. ती पुढीलप्रमाणे असावी :—

(१) कामगाराची पिळवणूक संपुष्टात आणावी.

(२) किमान वेतन हे अशाप्रकारे निश्चित करण्यात यावे की, त्यायोगे या उद्योगातील निरनिराळ्या वर्गीकरणांना त्याखाली योग्य प्रकारे आणणे शक्य व्हावे.

(३) उर्वरित महाराष्ट्रातील उपभोक्ता किंमत निर्देशांक हा मुंबईतील निर्देशांकापेक्षा साधारणत: कमी आहे किंवा प्रादेशिक फरक इतका जास्त आहे की, त्यामुळ विभाग निश्चित करून देणे आवश्यक आहे असे आढळून आल्यास असे विभाग निश्चित करण्यात यावे.

(४) कोणत्याही बाबतीत उद्योग विस्तारेल याची खात्री करून घेतली पाहिजे. किमान वेतनाचा बोजा पेलण्याच्या स्थितीत तो असला पाहिजे. तथापि, ही वस्तुस्थिती किमान वेतनापेक्षा अधिक वेतन देणाऱ्या उद्योगात वेतन निश्चित करणाऱ्या न्यायाधिकरणाच्या बाबतीत जशी विचारात घेतली जाते त्याप्रमाणेच विचारात घेतली पाहिजे असे नाही.

४.६. सध्या, प्लॅस्टिक उद्योगाने विशेषत: घरगुती गरजेच्या वस्तूंपासून औद्योगिक पॅकेजिंग, तसेच औद्योगिक गरजेच्या वस्तूंपर्यंत सर्व मानवी व्यवहाराचे जवळजवळ सर्वच क्षेत्र व्यापले आहे. प्लॅस्टिकची भांडी स्वयंपाकासाठी वापरली येत नाहीत. हा एक अपवाद सोडल्यास इतर वापरासाठी प्लॅस्टिकचा वापर करण्यात येत आहे आणि म्हणून, प्लॅस्टिक उद्योगाने कोणतेही क्षेत्र बाकी ठेवलेले नाही, शस्त्रक्रियेची उपकरणे बनवणाऱ्या प्लॅस्टिक उद्योगापासून बुचासारख्या लहानशा वस्तूंपर्यंत प्लॅस्टिक उद्योग सर्व मानवी व्यवहारांच्या सर्व

कार्यासाठी उपयोगी असलेल्या वस्तूंचा पुरवठा करीत आहे. प्लॅस्टिक उद्योगाचे क्षेत्र विशाल आहे. व त्यामुळे अलिकडील काही वर्षांत या उद्योगाने उल्लेखनीय प्रगती केली आहे. पूर्वी आम्ही प्लॅस्टिकच्या अनेक वस्तूंची आयात करीत असू. आता आम्ही काहीही आयात करीत नाही. उपयुक्त वस्तूंच्या उत्पादनासाठी आवश्यक असलेला कच्चा माल देखील काही प्रमाणात भारतातच बनवण्यात येतो. या उद्योगाचे वाढते महत्त्व व त्या उद्योगाची सध्याची प्रगत स्थिती आणि त्याची स्वयंपूर्णता या गोष्टी लक्षात घेता दुकाने व व्यापारी संस्था यांच्या बाबतीत अलिकडेच निश्चित केलेल्या किमान वेतन दरापेक्षा या उद्योगासाठी निश्चित करावयाचा किमान वेतन दर अधिक असावा व तो निदान अभियांत्रिकी उद्योगातील किमान वेतन दराइतका असावा. सध्याच्या घटकेला अभियांत्रिकी उद्योगात तीव्र मंदी आलेली आहे. अशी गंभीर स्वरूपाची मंदी प्लॅस्टिक उद्योगात नाही व म्हणून प्लॅस्टिक उद्योगाच्या अविरत प्रगतीची खात्री असल्यामुळे प्लॅस्टिक उद्योगात अधिक वेतन द्यावे अशी कळकळीची विनंती हा संघ करीत आहे.

## प्रकरण पाच

## वेतनाची समस्या

### अनुसूचीकडून मिळालेले वेतनाचे चालू स्वरूप

५.१. योग्य व न्याय पद्धतीने किमान वेतनात सुधारणा करण्याच्या कळकळीने प्रश्न-मालिका पाठवून व प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन चौकशी करून प्लॅस्टीक उद्योगात सध्या चालू असलेल्या वेतनाच्या स्वरूपाचा अभ्यास करण्याचे या समितीने ठरवले. कुशल, अर्ध-कुशल व अकुशल कामगारांना देण्यात येणाऱ्या कमाल व किमान वेतनासंबंधीची माहितीसुद्धा १६ कारखान्यांकडून मालक संघामार्फत आली होती. ज्या १६ कारखान्यांनी माहिती पुरवली त्यामध्ये येणाऱ्या कमाल व किमान वेतनांच्या माहितीचा सारांश जोडपत्र 'क-१' मध्ये दिला आहे. कामगार आयुक्तांच्या कार्यालयातील अन्वेक्षकांमार्फत प्रचार करण्यात आलेल्या अनुसूच्यांतून मिळवलेली, कारखाने अधिनियम आणि दुकाने व व्यापारी संस्था अधिकायम या दोन्ही अधिनियमाखाली येणाऱ्या २०० कारखान्यांच्या बाबतीत या समस्येवरील माहिती जोडपत्रे 'अ' 'ब' व 'क' यामध्ये दिली आहे. त्याचप्रमाणे विविध कारखान्यांना दिलेल्या भेटीतून समितीने मिळवलेल्या माहितीचा सारांश जोडपत्र 'क' मध्ये दिला आहे.

### मिळवलेल्या माहितीचा सारांश

५.२. या सर्व माहितीच्या विश्लेषणावरून असे दिसून येते की, पुष्कळशा कारखान्यांमध्य कामगारांना १९६९ च्या कायद्यानुसार निश्चित केलेल्या किमान वेतनांत थोडी तरी वाढ मिळाली आहे. अकुशल कामगारांकरिता ही वाढ १२ टक्केपर्यंत आहे. काही लहान कारखान्यांमध्ये, विशेषत: ज्या क्षेत्रात कामगारांची सौदा करण्याची शक्ती मर्यादीत आहे, अशा ठिकाणाच्या कारखान्यांमध्ये कामगारांना कायद्याने विहित केलेल्या किमान वेतनापेक्षाही कमी वेतन दिले जात होते. याउलट, मोठ्या कारखान्यांमध्ये, जेथे कामगारांची त्यांच्या मालकाशी सामूहिक सौदा करून करार करण्याची क्षमता असून ते चांगल्या प्रकारे संघटित आहेत व जेथे कारखानेसुद्धा पुरेसा पगार देऊ शकतात तेथे सफाईगार, चपराशी व श्रमाची कामे करणारे कामगार अशासारख्या अकुशल कामगारांनाही कायद्याने विहित केलेल्या किमान वेतनापेक्षा जास्त वेतन मिळते. उदाहरण कायद्याने विहित केलेले किमान वेतन रुपये ३·६० एवढे असूनही "ब्लो प्लास्ट" आणि "ब्राईट ब्रदर्स" यांसारख्या मोठ्या कारखान्यांतील अकुशल कामगारांना दररोज रुपये ८·३० ते रुपये १५·०० इतके वेतन मिळते.

### इतर तत्सम उद्योगांमधील तुलनात्मक किमान वेतनांची माहिती

५.३. यापूर्वी शासनाने नेमलेल्या किमान वेतन समितीच्या शिफारशींच्या आधारे प्लॅस्टीक उद्योगासारख्याच इतर उद्योगांमध्ये निश्चित केलेल्या किमान वेतनांचा तुलनात्मक अभ्यास करणेही समितीला इष्ट वाटते.

अशा उद्योगांमध्ये निश्चित केलेलेया किंवा सुधारित वेतनांसंबंधीची माहिती पुढील तक्त्यात दिली आहे :—

| कारखान्याचे नाव | कामाचा प्रकार | किमान वेतन | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | विभाग एक | विभाग दोन | विभाग तीन | विभाग चार |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | रुपये | रुपये | रुपय | रुपये |
| (१) काच उद्योगातील रोजगार | (१) कुशल-अ .. | २६०·०० | २०८·०० | १७५·०० | ... |
| | (२) कुशल-ब .. | २४७·०० | १९५·०० | १६२·५० | ... |
| | (३) कुशल-क .. | २३४·०० | १८४·०० | १४३·०० | ... |
| | (४) अर्ध-कुशल-अ .. | २१५·८० | १७१·६० | १३०·०० | ... |
| | (५) अर्ध-कुशल-ब .. | २०५·४० | १६३·८० | ११९·६० | ... |
| | (६) अकुशल .. | १९५·०० | १५६·०० | ११०·५० | ... |
| | (७) लिपिकवर्गीय व पर्यवेक्षकीय | | | | |
| | (कारखाना चालन) | | | | |
| | (१) प्रभारी, स्वयंचलित यंत्र | ३२५·०० | ३००·०० | २६०·०० | ... |
| | (२) आरेखक .. | २८५·०० | २६५·०० | २३०·०० | ... |
| | (३) पर्यवेक्षक (तांत्रिक) | २८५·०० | २६५·०० | २३०·०० | ... |
| | (४) पर्यवेक्षक (तांत्रिकेतर) | २६०·०० | २४५·०० | २१५·०० | ... |
| | (५) भांडारपाल .. | २५०·०० | २३०·०० | १८५·०० | ... |
| | (६) समयपाल .. | २४०·०० | २२५·०० | १७०·०० | ... |
| | (७) लिपिक .. | २३०·०० | २२०·०० | १६०·०० | ... |
| | (८) रिपोर्टर .. | २००·०० | १९०·०० | १३०·०० | ... |

| १ | | | | | | ६ |
|---|---|---|---|---|---|---|
| (२) पेपर अँड पेपर बोर्ड मॅन्युफॅक्टरीमधील रोजगार | | दरमहा | दरमहा | | | |
| | (१) श्रेणी-एक .. | ३००·०० | २६५·०० | | | ... |
| | (२) श्रेणी-दोन .. | २६३·०० | २२७·०० | | | ... |
| | (३) श्रेणी-तीन .. | २२६·०० | २०१·०० | | | ... |
| | (४) श्रेणी-चार .. | २०६·०० | १८१·०० | | ... | ... |
| | (५) श्रेणी-पाच .. | १८६·०० | १६१·०० | | | ... |
| | (६) श्रेणी-सहा .. | १६०·०० | १३५·०० | | ... | ... |
| | (७) लिपिक .. | २३८·०० | २१३·०० | | ... | ... |
| | | (शिवाय विशेष भत्त्याचा हक्क आहे.) | | | | |
| (३) इंजिनिअरिंग उद्योगामधील रोजगार | | दररोज | दररोज | दररोज | दररोज | |
| | (१) अतिकुशल .. | १३·८० | ११·७५ | १०·२५ | ८·३० | |
| | (२) कुशल .. | ११·०० | ९·४० | ८·३० | ६·७० | |
| | (३) अर्ध-कुशल .. | ९·६० | ८·२० | ७·३० | ५·९० | |
| | (४) अकुशल .. | ८·५० | ७·२५ | ६·५० | ५·२५ | |
| | | दरमहा | दरमहा | दरमहा | दरमहा | |
| | (५) कनिष्ठ लिपिक .. | २७०·०० | २३०·०० | २०५·०० | १६५·०० | |
| | | (शिवाय विशेष भत्त्याचा हक्क आहे.) | | | | |
| (४) रबर मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रिजमधील रोजगार | | दररोज | दररोज | दररोज | दररोज | |
| | (१) कुशल .. | ७·०० | | | | |
| | (२) अर्ध-कुशल .. | ६·०० | ... | ... | ... | |
| | (३) अ-कुशल .. | ५·०० | ... | ... | ... | |
| | | (शिवाय विशेष भत्त्याचा हक्क आहे.) | | | | |

**राहणीमान खर्चाचा निर्देशांक व मजुरी**

४.६. अलिकडच्या काही वर्षांत राहणीमानाचा खर्च वाढत आहे आणि ज्याचे उत्पन्न ठरीव असते त्यांना त्याचा आघात विशेष जाणवतो. विशेषत: ज्यांची कमाई जेमतेम निर्वाहापुरतीच असते असे श्रमजीवी वर्गातील लोक वाढत्या किमतींच्या या काळात विशेष मेटाकुटीस येतात.

४.७. महाराष्ट्र राज्यातील विविध केंद्रांकरिता उपभोक्ता किमत निर्देशांकात किमतींच्या पातळीमध्ये जी तुलनात्मक वाढ झाल्याचे आढळून आले आहे ती दर्शविणारा तक्ता खाली दिला आहे :—

| केंद्र | आधार वर्ष | १९६९ | १९७० | १९७२ | १९७५ | डिसेंबर, १९७५ |
|---|---|---|---|---|---|---|
| मुंबई | १९६०=१०० | १७३ | १८४ | १९८ | ३०३ | २९६ |
| सोलापूर | १९६०=१०० | १७३ | १९३ | २०७ | ३५२ | ३३८ |
| नागपूर | १९६०=१०० | १७२ | १८९ | २०८ | ३३६ | ३२९ |
| पुणे | १९६०=१०० | १६१ | १६८ | १८७ | २९९ | २९८ |
| जळगाव | १९६१=१०० | १७३ | १८९ | २०३ | ३४५ | ३२२ |
| औरंगाबाद | १९६१=१०० | १७३ | १८४ | २११ | ३६४ | ३२७ |
| नांदेड | १९६१=१०० | १७८ | १९३ | २२६ | ३४० | ३३७ |

४.८. तथापि नोव्हेंबर १९७५ पासून उपभोक्ता किमत निर्देशांक सर्वसाधारणपणे खाली येत असल्याचे दिसत आहे. असे असले तरी १९६९ ते १९७५ या कालावधीतील उपभोक्ता किमत निर्देशांकाचा आकडा असे दर्शवितो की, सर्व केंद्रांवरील उपभोक्ता किमत निर्देशांकाचा आकडा १९६९ या वर्षाच्या सरासरी निर्देशांक आकड्यापेक्षा जवळजवळ १०० टक्क्याने वर गेला होता. उदा. मुंबईतील सरासरी निर्देशांक १९६९ मध्ये १७३ होता तर १९७५ मधील सरासरी उपभोक्ता किमत निर्देशांक ३०३ आहे. वेतन ठरवताना समितीने या घटनेची दखल घेतली आहे. राहणीमानाच्या वाढत्या खर्चाचा परिणाम ज्यायोगे पूर्णपणे जिरून जाईल. अशाप्रकारे कामगारांना देय असलेल्या वेतनात या वर्षात अतुल्य वाढ झालेली नाही.

**किमान वेतनाची संकल्पना व त्याबाबतचा आमचा दृष्टिकोन**

४.९. १९४८ च्या किमान वेतन अधिनियमात किमान वेतनाची कोणतीही व्याख्या दिलेली नाही. इतकेच केवळ नव्हे तर असे वेतन ज्याच्या आधारे निश्चित करता येईल असे कोणतेच तत्त्व सुद्धा त्यात नाही हे येथे नमूद करता येईल. अनेक अधिकारी व्यक्तींनी व कामगार अर्थशास्त्रज्ञांनी आपापल्या परीने किमान वेतनाची व्याख्या देण्याचा व निर्वाह वेतन व योग्य वेतन यांपासून किमान वेतन वेगळे आहे हे दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु या दोन्हींमध्ये त्यांनी दाखविलेल्या अशा फरकामुळे कोणत्याही समितीला किमान वेतन निश्चित करण्यास सहाय्यभूत होईल असे कोणतेही वस्तुनिष्ठ मानक उपलब्ध होत नाही. कामगारांच्या जीवनावश्यक किमान गरजा भागवण्यासाठीच केवळ नव्हे तर त्याला शिक्षण

घेता येईल व इतर किमान सोयींचा लाभ घेऊन एक कार्यक्षम कामगार बनवण्यासाठी थोडेफार उत्पन्न राहील इतपत किमान वेतनाची तरतूद त्याच्यासाठी केली पाहिज हे कोणीही नाकारणार नाही. १९६९ मध्ये किमान वेतन जेव्हा निश्चित करण्यात आले होते त्यावेळे-पासून राहणीमानाच्या खर्चात झालेली वाढ विचारात घेतली जाणे अत्यंत आवश्यक आहे.

५.७. या प्रश्नावर विचार करतेवेळी समितीला मालक व कामगार या दोघांचेही दृष्टीकोन विचारात घ्यावे लागले. कामगारांच्या प्रतिनिधींचे म्हणणे असे होते की आजवर कायद्याने जे किमान वेतन ठरवून दिले त्यामुळे कामगारांना चांगल्या राहणीमानाचा उपभोग घेता आलेला नाही. त्यांच्या मते निश्चित केलेल्या किमान वेतनात जेमतेम उदरनिर्वाहा-पुरतीच तरतूद न करता त्यात आरोग्य व चांगल्या राहणीमानाची तसेच मुलांचे शिक्षण, त्यांचे रोगराईपासून संरक्षण, अत्यावश्यक सामाजिक गरजा भागवण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या सोयींची आणि गंभीर आपत्प्रसंगाच्या बाबतीत काही प्रमाणात विम्याच्या स्वरूपा-तील संरक्षण यासारख्या स्वल्पव्ययी सुखकर गोष्टींचीही तरतूद असणे आवश्यक आहे.

५.८. याउलट मालकांचे असे मत आहे की, किमान वेतनात वरील गोष्टींसाठी तरतूद करण्यात आली तर, त्यामुळे प्लॅस्टिक उद्योग पंगू होईल व आपापले कारखाने बंद करणे भाग पडेल. या मालकांचे म्हणणे असे आहे की, काही महत्त्वाच्या रोजगारांसाठी समितीने निश्चित केलेले किमान वेतनाचे दर फार जास्त आहेत व याच वेळेस प्लॅस्टिक कच्चा माल, वीज, रसायन व इतर सुटे भाग यांच्या किंमती वाढल्याने व तसेच वीजकपात व उत्पादन शुल्कात झालेली भरमसाट वाढ यामुळे प्लॅस्टिक उद्योगाला आणखी बोजा सहन करणे दिवसेंदिवस कठीण जात आहे. शेजारच्या राज्यांमधील ज्या प्लॅस्टिक उद्योगाला किमान वेतन, जकात कर इत्यादींच्या रुपाने बऱ्याच कमी प्रमाणात वित्तीय बोजा सोसावा लागतो. अशा उद्योगाबरोबर तीव्र स्पर्धेला तोंड द्यावे लागते. या वस्तुस्थितीमुळे देखील आपल्या उद्योगाची स्पर्धाविषयक परिस्थिती आणखीनच विस्कळीत होईल असेही या मालकांना वाटते. किमान वेतनाच्या दरात सुधारणा सुचविताना समिती या किमान वेतनाची उपभोक्ता किंमत निर्देशांकाशी सांगड घालू नये, तसे केल्यास कामगारांना विशेष भत्ता द्यावा लागेल असे मालकांना वाटते.

५.९. समितीने, आपल्या शिफारशींमध्ये मालक व कामगार यांनी मांडलेल्या मुद्यांची योग्य ती वूज राखली. किमान वेतनात करावयाची सुधारणा ही निर्वाह वेतन किंवा गरजां-वर आधारलेल्या वेतनाच्या संदर्भात ठरवणे शक्य नाही असे या समितीला वाटते. ज्या किमान वेतनात कामगाराच्या निव्वळ उदरनिर्वाहाचा विचार करण्यात आलेला असेल व ज्यात कामगार कार्यक्षमतेने काम करू शकेल अशीही सोय असेल परंतु या सर्व गोष्टीं-बरोबरच प्लॅस्टिक उद्योगात किंवा त्याच्या संपूर्ण अर्थव्यवस्थेत ज्यामुळे कोणतीही अस्थिरता निर्माण होणार नाही अशा कायदेशीर किमान वेतनाची शिफारस करण्याचे या समितीने निश्चित केले आहे. म्हणून समितीने किमान वेतनाचा एक मूळ दर व भविष्यकाळात राहणीमानाच्या निर्देशांकातील व चढ-उतारानुसार बदलणारा विशेष भत्ता निश्चित करून देण्याचे ठरविले आहे.

**किमान वेतनाच्या कक्षेतून वगळण्यासंबंधीचा युक्तिवाद**

५.१०. फाऊंटन पेन उत्पादक, बांगड्यांचे उत्पादक यांच्याकडून आलेली अभिवेदनेही समितीने विचारात घेतली आहेत.

वरील उद्योगांच्या प्रतिनिधींनी आपल्याला प्लास्टिक उद्योगातून आणि किमान वेतन दर लागू करण्यासंबंधीच्या नियमातून वगळावे अशी इच्छा प्रदर्शित केली होती. या उद्योगाच्या सर्व प्रतिनिधींनी मिळून एक असा सामाईक युक्तिवाद केला की, हा उद्योग असंघटित असून तो जवळजवळ कुटिरोद्योगच आहे आणि तो फार मोठ्या प्रमाणावर कामगारप्रधान उद्योग आहे. महाराष्ट्र राज्यातील वेतनाच्या व कराच्या दरापेक्षा कमी दर व कमी कर जेथे आकारले जातात अशा इतर राज्यांबरोबरच्या स्पर्धेस त्यांना तोंड द्यावे लागते असेही त्यांचे म्हणणे आहे. या सर्व गोष्टी विचारात घेता या मुद्यावर भर देण्यात आला की, वरील उत्पादनाच्या प्रक्रियांकरिता किमान वेतन निश्चित करण्यासाठी एक तर स्वतंत्र समितीची स्थापना करण्यात यावी किंवा प्रस्तावित किमान वेतन लागू करण्यासंबंधीच्या नियमातून त्यांना पूर्णपणे वगळण्यात यावे.

५.११. या उद्योगाला संरक्षण देण्याच्या व तो पुढे चालू ठेवण्याच्या दृष्टीने कर आकारणी व त्या उद्योगात होणारी स्पर्धा यामध्ये येणाऱ्या अडचणी हा असा प्रश्न आहे की, ज्यावर शासनानेच विचार केला पाहिजे. तथापि, समितीचा विचारार्थ विषय व अनुसूचीत असलेली या उद्योगाची व्याख्या विचारात घेतल्यानंतर वरील युनिटांच्या प्रतिनिधींनी मांडलेले मुद्दे या समितीच्या कक्षेत येत नसल्याने विचारात घेणे शक्य नाही असे समितीला वाटते.

* * *

# प्रकरण सहा

# शिफारशी

**प्रस्तावना**

६.१. कामगारांनी व्यक्तिशः किंवा आपापल्या प्रातिनिधिक श्रमिक संघांमार्फत जे विचार प्रदर्शित केले त्याप्रमाणे मालकांनी आणि त्यांच्या संघांनी जो युक्तिवाद केला तो या समितीने काटेकोरपणे विचारात घेतला आहे. समितीने महाराष्ट्र राज्यातील महत्त्वाच्या ठिकाणी असलेल्या प्लास्टिक उद्योगाच्या काही कारखान्यांमधील कामाची परिस्थिती आणि विद्यमान वेतनाची पातळी यांची तपासणी करण्यासाठी त्यांची पाहणी करण्याचे काम हाती घेतले.

समितीने तिच्यापुढे सादर केलेल्या तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे देखील काळजीपूर्वक विश्लेषण केले. प्लास्टिक उद्योगात असणाऱ्या परिस्थितीसारख्याच परिस्थितीत ज्या उद्योगात काम करावे लागते अशा उद्योगात वेतन निश्चितीचा अलिकडील कल काय आहे याची तपासणी करणे या समितीला मागाहून इष्ट वाटले व तिने या उद्योगातील किमान वेतनातील वाढीचा परिणाम लक्षात घेतला. समितीने आपले निष्कर्ष काढताना आणि प्लास्टिक उद्योगातील किमान वेतनाच्या संबंधातील शिफारशी करताना आमच्या नियोजनाच्या मांडणीमागील एक प्रधान तत्त्व असलेल्या "स्थैर्य वृद्धि व सामाजिक न्याय" या तत्त्वाला विशेष महत्त्व (Weightage) दिले. समितीला असे वाटले की, ज्या किमान वेतनाची शिफारस करावयाची त्यामुळे केवळ कामगारांना तर सामाजिक न्याय खात्रीने मिळालाच पाहिजे पण त्याचबरोबर कामगारांना दीर्घकालीन रोजगार वाढत्या प्रमाणात मिळत राहून उद्योगधंद्याची वाढ देखील खात्रीने झाली पाहिजे. समितीला असेही वाटले की, कायदेशीर रीत्या ठरवून दिलेले वेतन हे कामगाराला केवळ किमान त्याच्या आवश्यक गरजा भागवून ज्यामुळे तो उपासमारीपासून वाचेल एवढ्या निर्वाह वेतनापुरतेच नसावे तर ते ज्यामुळे कामगाराला काही सर्वसामान्य गरजा असलेल्या एका सुसंस्कृत समाजाचा घटक म्हणून सुसंस्कृत अस्तित्वाचा लाभ खात्रीने होईल असे असावे. या मूलभूत विचारसरणीच्या अनुषंगाने समितीनेच एकमताने खालील शिफारशी करण्याचे ठरविले :—

**कर्मचाऱ्यांचे वर्गीकरण**

६.२. वेगवेगळ्या वर्गाच्या किमान वेतनाच्या दरात सुधारणा करण्यासंबंधीच्या शिफारशी करताना समितीने कर्मचाऱ्यांचे सध्याचे वर्गीकरण तसेच ठेवण्याचे व त्यामध्ये तीन नवीन वर्गांची भर घालण्याचे ठरविले आहे.

६.३. प्लास्टिक उद्योगातील काही कारखान्यांची पाहणी करताना समितीला असे आढळून आले की, पूर्वीच्या समितीने वेतनाचे किमान दर निश्चित केले त्यावेळी अस्तित्वात नसलेल्या अशा काही नवीन प्रक्रिया आता अस्तित्वात आल्या आहेत. या उद्योगातील कामगारांच्या किमान वेतनात सुधारणा करण्याची शिफारस करताना समितीला या नवीन प्रक्रियांची कामे करणाऱ्या कामगारांच्या वेतनाची जडणघडण लक्षात घेणे भाग पडले. म्हणून, पूर्वीच्या

समितीने केलेले कामगारांचे वर्गीकरण कायम ठेवून या समितीने या नवीन प्रक्रियांवर नेमलेल्या कामगारांचा अंतर्भाव असलेल्या दोन नवीन वर्गांची त्यात भर टाकण्याचे ठरविले आहे. तसेच, पूर्वीच्या समितीने किमान वेतन निश्चित करताना या उद्योगात काम करणाऱ्या लिपिकवर्गीय व पर्यवेक्षी कर्मचाऱ्यांचा स्वतंत्र निर्देश केलेला नव्हता असे आढळून आले. असा कर्मचारीवर्ग समितीने उल्लेखिलेल्या कोणीही या वर्गात सर्वसाधारणपणे धरण्यात आला. म्हणून समितीला असे वाटले की, अशा कर्मचाऱ्यांचा स्वतंत्रपणे वर्ग मानणे न्याय व उचित ठरेल. म्हणून, यावरून हे ध्यानात येईल की, अतिकुशल 'ब' आणि अतिकुशल 'अ' या दोन नवीन वर्गांच्या संबंधातील किमान वेतनाबाबतच्या शिफारशी या पूर्वीच्या किमान वेतनाच्या सुधारणेविषयी नाहीत तर त्या किमान वेतन प्रथमतःच ठरवून देण्याबाबतचा आहे. अशा रीतीने पूर्वीच्या समितीने केलेले कामगारांचे जुने वर्गीकरण कायम ठेवून आणि त्यामध्ये या दोन नवीन वर्गांची भर घालून आणि लिपिकवर्गीय व पर्यवेक्षकीय कर्मचाऱ्यांचा स्वतंत्र वर्ग करून ही समिती कर्मचाऱ्यांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे असावे अशी शिफारस करीत आहे :—

१. अकुशल
२. अर्ध-कुशल 'ब'
३. अर्ध-कुशल 'अ'
४. कुशल
५. अतिकुशल 'ब'
६. अतिकुशल 'अ'
७. लिपिकवर्गीय व पर्यवेक्षकीय.

कर्मचारीवर्ग व त्याखाली अंतर्भूत असलेले विविध व्यवसाय.

म्हणून ही समिती सुधारित किमान वेतन खालील प्रमाणे असावे अशी शिफारस करीत आहे :—

| वर्गीकरण | विभाग | विभाग | विभाग |
|---|---|---|---|
| अकुशल | ६.९० | ६.८० | ६.६० |
| अर्धकुशल 'ब' | ७.२० | ७.०५ | ६.८० |
| अर्धकुशल 'अ' | ७.६५ | ७.३० | ७.१५ |
| कुशल | ८.९० | ८.७० | ८.५० |
| | द. म. रुपये | द. म. रुपये | द. म. रुपये |
| लिपिक .. .. | २३५ | २२५ | २०७ |

६.५. सर्व वस्तुस्थिती ध्यानात घेता, या समितीचे असे मत पडले की, पर्यवेक्षी कामासाठी आणि इतर प्रकारच्या पर्यवेक्षकांसाठी तसेच भांडारपालांसाठी वेगळी वेतनश्रेणी असली पाहिजे. म्हणून, ही समिती निरनिराळ्या विभागांसाठी, या कामाकरिता किंवा लघुलेखक नि टंकलेखक किंवा अनुभवी लेखापाल यांसारख्या अनुभवी किंवा विशिष्ट ज्ञान असलेल्या लिपिकाचे काम अंतर्भूत असलेल्या इतर कोणत्याही कामाकरिता खालीलप्रमाणे वेतनाचे किमान दर असलेल्या खालील वेतनश्रेणीची व ती वर नमूद केलेल्या वर्गात घालण्यात यावी अशी शिफारस करीत आहे.

| विभाग एक | विभाग दोन | विभाग तीन |
|---|---|---|
| दर महा रु. ३०० ·०० | रुपये २८५ · ०० | रुपये २५० · ०० |

तथापि, वर उल्लेखिलेल्या व्यवसायात कामावर असलेल्या व्यक्ती ह्या संबद्ध पदवी, पदविका धारक असाव्यात किंवा अर्हताप्राप्त असाव्यात. तसेच त्यांना त्या व्यवसायातील ५ वर्षांचा अनुभव असावा. स्वत:ची कर्तव्ये त्यांना स्वतंत्रपणे पार पाडता आली पाहिजे. व तसेच कामे करण्याचे योग्य ज्ञान त्यांना असले पाहिजे.

६.६. मुंबई, नागपूर, पुणे, नाशिक व औरंगाबाद या ठिकाणांना भेट दिली त्यावेळी समितीला असे आढळून आले की, १९६९ मध्ये किमान वेतने अंमलात आणली त्यानंतर, प्लास्टिक उद्योगात काही नवीन युनिटे स्थापन करण्यात आली असून त्यांमध्ये विणलेल्या थैल्या व इतर विणलेले साहित्य तयार करण्यात येते. ही विणण्याची प्रक्रिया "हाय डेन्सिटी पॉलिथिन वोव्हन सॅक्स" या नावाने ओळखली जाते व ती स्थूलमानाने वस्त्रनिर्माण उद्योगातील प्रक्रियेसारखीच आहे. या विणाई युनिटांमध्ये तंतूपासून प्लॅस्टिकचे कापड बनवतात व या कापडापासून या थैल्या तयार करतात. रासायनिक पदार्थांची भुकटी व रासायनिक खते भरून ठेवण्यासाठी त्यांचा वापर करतात. या प्रयोजनासाठी आजवर पोत्यांचा वापर केला जात असे. त्याऐवजी आता या प्लास्टिक थैल्या त्यांच्या जागी रुढ होऊ पाहत आहेत. युनिटे उत्तम प्रकारचे विणलेले प्लास्टिकचे कापड तयार करतात. त्याचा उपयोग पलंगपोस इत्यादीसाठी करण्यात येतो.

६.७. या वस्तुनिर्माण युनिटांमध्ये अकुशल, अर्धकुशल व कुशल या वर्गांचे वरेच नवे व्यवसाय अस्तित्वात आले आहेत. १९६९ मध्ये पहिल्या किमान वेतन समितीने आपल्या शिफारशी केल्या तेव्हा हे व्यवसाय अस्तित्वात नव्हते. विद्यमान समितीला त्यांचा विचार करावा लागला. म्हणून, ही समिती, इतर प्लास्टिक युनिटांमधील तशाच वर्गांसाठी या अगोदर ज्या वेतन दराची शिफारस केली आहे तेच वेतन दर या वस्तुनिर्माण युनिटात कामावर असलेल्या अकुशल, अर्धकुशल व कुशल कामगारांसाठी शिफारस करीत आहे. येथे ही गोष्ट ध्यानात घ्यावी, प्लास्टिक विणाई युनिटांमध्ये असे शिफारस केलेले हे प्रथमच किमान वेतन असल्यामुळे ती वेतनाची पुनर्रचना ठरणार नाही. ज्या व्यवसायांसाठी या किमान वेतनाची शिफारस करण्यात आली आहे ते प्रत्यक्ष व्यवसायाखाली या शिफारशींच्या शेवटी निष्कर्षात दिले आहेत.

६.८. व्यवसायांच्या वरील वर्गाखेरीज इतर असे व्यवसाय आहेत की, ज्यांमध्ये कामगारांना विशेष स्वरूपाची कामे करावी लागतात. अशा कामांसाठी विशिष्ट कौशल्य व कसब आवश्यक असते, म्हणून, अशा व्यवसायात कामगारांना अति कुशल कामगार म्हणून समजावे, असे या समितीने ठरवले आहे. ह्या कामगारांची विभागणी दोन वर्गात करण्यात आली आहे.

(एक) अतिकुशल 'ब'

(दोन) अतिकुशल 'अ'

या वर्गासाठी प्रथमच शिफारस केलेले किमान वेतन पुढीलप्रमाणे आहे :—

| वर्गीकरण | विभाग एक<br>दर रोज<br>रुपये पै. | विभाग दोन<br>दररोज<br>रुपये पै. | विभाग तीन<br>दररोज<br>रु. पै. |
|---|---|---|---|
| अतिकुशल 'ब' .. | १०.०० | ९.०० | ८.७५ |
| अतिकुशल 'अ' .. | ११.०० | १०.०० | ९.५० |

या दोन वर्गांत वर्गीकरण केलेल्या व्यवसायांचा तपशील खाली "निष्कर्षात" दिलेला आहे.

**विभाग**

६.९. दोन्ही बाजूंच्या प्रतिनिधींनी केलेल्या सूचना लक्षात घेऊन आणि राहणीमान खर्चाचा निर्देशांक, राहणीपद्धती व महाराष्ट्र राज्याच्या निरनिराळ्या भागातील सद्यस्थिती लक्षात घेता, किमान वेतनाची पुनर्रचना करण्याच्या प्रयोजनासाठी प्लास्टिक उद्योगातील युनिटांची विभागणी पुढील विभागात करण्याचे ठरवले आहे :—

**विभाग एक.**— यामध्ये मुंबई महानगरपालिका, ठाणे नगरपालिका, कल्याण नगरपालिका, उल्हासनगर नगरपालिका, अंबरनाथ नगरपालिका यांच्या हद्दीत येणारी क्षेत्रे, तसेच बाकुम, माजीवडे ग्रामपंचायतींच्या हद्दीतील क्षेत्र आणि नवी मुंबई म्हणून संबोधण्यात येणारे ठाणे-बेलापूर क्षेत्र आणि उल्हासनगर, विठ्ठलवाडी, अंबरनाथ आणि अशा महानगरपालिका, नगरपालिका व यथास्थिती ग्रामपंचायतीच्या हद्दीपासून ३० कि. मी. अंतरामधील क्षेत्रे यांचा अंतर्भाव आहे.

**विभाग दोन.**— यामध्ये पुणे, नागपूर, सोलापूर, कोल्हापूर व नाशिक या शहरांच्या महानगरपालिकांच्या हद्दीत येणारी क्षेत्रे, तसेच पुणे कटक क्षेत्र, खडकी कटक क्षेत्र, देहू रोड कटक क्षेत्र, भोर या हद्दीतील क्षेत्रे व पिंपरी, चिंचवड नगरपालिका हद्द नवनगर-पालिका क्षेत्र, हडपसर क्षेत्र, लोणी काळभोर, खोपोली, पनवेल (यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे क्षेत्र समाविष्ट आहे. आणि महानगरपालिका, नगरपालिका किंवा यथास्थिती ग्रामपंचायतीच्या हद्दीपासून ३० कि. मी. अंतरामधील क्षेत्रे यांचा अंतर्भाव आहे.

**विभाग तीन.**— यामध्ये महाराष्ट्र राज्यातील विभाग एक व विभाग दोन यांमध्ये समाविष्ट न केलेल्या इतर सर्व क्षेत्रांचा अंतर्भाव आहे.

६.१०. **विशेष भत्यासाठी तरतूद.**— मागील परिच्छेदात शिफारस केल्याप्रमाणे मूलभूत किमान वेतनाबरोबरच आवश्यक वस्तूंच्या किंमतीतील अनिश्चित स्वरूपाची वाढ लक्षात घेऊन तसेच भविष्यकाळात राहणीमानाच्या खर्चात होणाऱ्या वाढीसाठी कामगारांना भरपाई देण्याच्या दृष्टीने किमान वेतन दराची ग्राहक मूल्य निर्देशांकाशी पुढील तत्वावर सांगड घालण्याची शिफारस ही समिती करीत आहे :—

मुंबईचा उपभोक्ता किंमत निर्देशांक २५८ आधारभूत धरून (नवीन मालिका १९६० आधारभूत) २५८ च्या वरील, प्रत्येक विभागातील प्रत्येक पॉइंटसाठी प्रत्येक वाढलेल्या पॉइंट मागे ०.३ पैसे याप्रमाणे विशेष भत्ता देण्यात यावा, उपभोक्ता किंमत निर्देशांकातील

वाढीची गणना जानेवारी ते मार्चपासून पुढच्या तीन महिन्यांच्या सरासरीच्या आधारे काढण्यात यावी.

---

६.११. समितीचे असे मत आहे की, कोणत्याही वर्गातील कामावर नेमलेल्या अल्पवयीन कामगारास तो ज्या वर्गात काम करीत असेल त्या वर्गातील कामगारास मिळणाऱ्या वेतनाच्या ७५ टक्के रक्कम देण्यात यावी. ही अट विभाग एक, विभाग दोन व विभाग तीनला लागू आहे. कोणत्याही वर्गात काम करीत असलेल्या मुलांना त्या वर्गात काम करणाऱ्या कामगारासाठी निश्चित केलेल्या वेतनाच्या ५० टक्के वेतन द्यावे. हे विभाग एक, विभाग दोन, विभाग तीनला लागू आहे.

६.१२. शिकाऊ उमेदवारांच्या बाबतीत ते ज्या वर्गात काम करीत असतील त्याप्रमाणे किमान वेतन दर हे कुशल, अर्ध-कुशल 'ब', अर्ध-कुशल 'अ' किंवा यथास्थिती अति-कुशल 'ब' व 'अ' कामगारांच्या वर्गासाठी निश्चित केलेल्या वेतनाच्या ७५ टक्के इतके असतील.

६.१३. रोजदारीवर कामावर लावलेल्या कामगारांच्या बाबतीत, रोजदारीचे किमान दर हे, तो ज्या वर्गात काम करीत असेल त्या वर्गातील कामगारासाठी निश्चित केलेल्या किमान मासिक वेतनास २६ ने भागून परिगणित करण्यात यावे. भागाकार जवळच्या पूर्ण पैशांत काढण्यात यावा.

**निष्कर्ष**

६.१४. आम्ही केलेल्या शिफारशींचा निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहे :—

(१) प्लास्टिक उद्योगात नोकरीवर असलेल्या कर्मचाऱ्यांचे वर्गीकरण खालील गटांत करावे :—

(एक) अतिकुशल, (दोन) अर्ध-कुशल 'ब', (तीन) अर्ध-कुशल 'अ', (चार) कुशल, (पाच) अतिकुशल 'ब', (सहा) अतिकुशल 'अ', (सात) लिपिकवर्गीय व पर्यवेक्षकी कर्मचारीवर्ग आणि त्या गटातील विविध व्यवसाय.

(२) राज्यातील क्षेत्राचे वर नमूद केल्याप्रमाणे तीन विभाग केले पाहिजेत.

(३) कामगारांचे वर्ग व वेतनाचे दर खालीलप्रमाणे असावेत :—

# अनुसूची एक

| अनुक्रमांक | वर्ग | विभाग एक | | विभाग दोन | | विभाग तीन | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मासिक | दैनिक | मासिक | दैनिक | मासिक | दैनिक |
| १ | | ३ | | ४ | | ५ | |
| | | रुपये पैसे | रुपये पैसे | रुपये पैसे | रुपये पैसे | रुपये पैसे | रुपये पैसे |
| | अकुशल | १४२.०० | ७.०० | १७६.८० | ६.८० | १७१.६० | ६.६० |
| १ | बँगल सेपरेटर | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २ | बॅरल मिक्सर/हँड मिक्सर | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ३ | बँगल सॉर्टर/पॉलिशर | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ४ | सिमेंटर/पेस्टार | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ५ | क्लीनर | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ६ | गणक (काऊंटर) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ७ | गाडीवाला (कार्टमन हँड) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ८ | पूरक (फीडर) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ९ | फिनिशर (finisher) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १० | फाईलमन (fileman) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ११ | फोल्डर (folder) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १२ | घर्षक (प्लास्टिक वस्तू) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १३ | सर्वसाधारण कामगार (जनरल वर्कर) (लोडर-अनलोडर) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १४ | यांत्रिकाचा मदतनीस | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १५ | मदतनीस (सर्वसाधारण) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १६ | हीटरमन (heaterman) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १७ | हँड ट्रींबर (Hand Trimber) | ... | ... | ... | ... | ... | ... |

अनुसूची एक—चालू

| अनुक्रमांक | वर्ग | विभाग एक |  | विभाग दोन |  | विभाग तीन |  |
|---|---|---|---|---|---|---|---|
|  |  | मासिक | दैनिक | मासिक | दैनिक | मासिक | दैनिक |
| १ | २ | ३ |  | ४ |  | ५ |  |
|  |  | रुपये पैसे | रुपये पैसे | रुपये पैसे | रुपये पैसे | रुपये पैसे | रुपये पैसे |
| १८ | घोडीवाला/सिलिंडरमन (Ghodiwalla Cylinderman) .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १९ | लोहचुंबकीय विभाजक .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २० | मजदुर .. .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २१ | नोज फायनर (Nose finier).. . | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २२ | निब फिट ड्रमर (Nib fit-drumer). .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २३ | निब फिट असिस्टंट (Nib fit Assistant) .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २४ | पावडर सीव्हर (Powder siever). | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २५ | पावडर प्रीहीटर (Powder Preheater) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २६ | चपराशी .. .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २७ | आवेष्टक (हाती) (पॅकर) .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २८ | पेन असेंब्लर (Pen assembler) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २९ | रिंग असेंब्लर (Ring assembler) |  |  |  |  |  |  |
| ३० | रिंग साईझर (Ring Sizer) .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ३१ | स्टँपर (Stamper) .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ३२ | सफाई कामगार .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ३३ | स्क्रॅंपर (Scramper) .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ३४ | स्प्रेचर (Specher) .. | ... | ... | ... | ... | ... | ... |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३५ स्टिच फिक्सर (Stitch fixer). | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ३६ सॉल्डर (प्लास्टिक) (Solderer). | | | | | | |
| ३७ सॉडस्ट सीव्हर (Saw dust Siver). | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ३८ शॉट ब्रेकर (Sheet breaker) .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ३९ शीट निब ग्राइंडर (Sheet Nib Grinder). | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ४० प्लास्टिक सीलींग वर्कमन (Plastic sealin workman). | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ४१ टॅपर (Tapper) .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ४२ पहारेकरी .. .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ४३ पाणीवाला .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ४४ निब काऊंटर .. | ... | ... | ... | ... | .. | ... |
| ४५ निब एम्बॉसर्स ऑन हॅन्ड प्रेस (Nib embossers on hand press) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ४६ शीट, फॉईल, व फिल्म कटर .. (Sheet, foil and film cutter) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ४७ वरील नोंदीखाली यणाऱ्या व्यक्तीकडून करण्यात येणाऱ्या स्वरूपाचे अकुशल काम करणारे कर्मचारी, मग त्यांना कोणत्याही नावाने संबोधण्यात यत असो | ... | ... | ... | ... | ... | ... |
| अर्ध कुशल बी— | १८७·२० | ७·२० | १८२·०० | ७·०० | १७६·८० | ६·८० |
| १ बडर (Bender) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २ कुली फॉमिंग मन | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ३ खोका बनवणारा | ... | ... | ... | ... | ... | ... |

अनुसूचि एक—चालू

| अनुक्रमांक | वर्ग | विभाग एक मासिक | विभाग एक दैनिक | विभाग दोन मासिक | विभाग दोन दैनिक | विभाग तीन मासिक | विभाग तीन दैनिक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | | ५ | |
| | | रुपये पैसे | रुपये पैसे | रुपये पैसे | रुपये पैसे | रुपये पैसे | रुपये पैसे |
| ४ | बॉल मिल ऑपरेटर | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ५ | ड्रायर (Drier) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ६ | शाई भरणारा (बॉल पेन) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ७ | धातु व प्लास्टिकचे भाग एकत्र बसवणारा | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ८ | निब स्लिटर Nib slitter .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ९ | निब टेस्टर Nib tester .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १० | ऑर्डर सॉर्टर Order sorter | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ११ | निरीक्षण आणि अवेष्टन ही कामे करणारा अवेष्टक .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १२ | सँडर Sander .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १३ | सॉ डस्ट ग्राइंडर/सॉ डस्ट ऑपरेटर Saw dus grinder/Saw dust operater | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १४ | सरफेस ग्राइंडर Surface grinder | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १५ | स्ट्रिप स्लिटर Strip slitter .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १६ | तेलवाला | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १७ | हात यंत्र चालक (हँड मशीन ऑपरेटर) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १८ | हँड प्रेस ऑपरेटर .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १९ | मिलिंग बेंच मेकर | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २० | ड्रेसर .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २१ | टी. वाय. प्रेसमन .. | ... | ... | ... | ... | ... | ... |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २२ | बफर (बफ काम करणारा) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २३ | वरील नोंदीखाली येणाऱ्या व्यक्तींकडून करण्यात येणाऱ्या स्वरूपाचे अर्धकुशल 'ब' दर्जाचे काम करणारे कर्मचारी मग त्यांना कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| | अर्ध कुशल 'अ' .. | १९५.०० | ७.५० | १८९.८० | ७.३० | १८४.६० | ७.१० |
| १ | निरनिराळे भाग एकत्र बसवणारा (स्वयंचलित यंत्रावर) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २ | वॉल मिल वेइंग इन चार्ज .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ३ | खोका शिवणारा .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ४ | तपासनीस (पर्यवेक्षक) .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ५ | डाय पॉलिशर (Die polisher) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ६ | पल्व्हरायझर .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ७ | पॉवर प्रेसमन .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ८ | पॉवर पॉलिशर .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ९ | रेझिन भट्टी ऑपरेटर .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १० | रोलिंग यंत्रचालक (मशीन ऑपरेटर) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ११ | टॅब्लेट यंत्रचालक (मशीन ऑपरेटर) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १२ | टूथ ब्रश फिलींग मशीन ऑपरेटर | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १३ | असेंब्ली यंत्रचालक (मशीन ऑपरेटर) | ... | ... | ... | ... | ... | ... |

| अनुक्रमांक १ | वर्ग २ | विभाग एक मासिक ३ | विभाग एक दैनिक ३ | विभाग दोन मासिक ४ | विभाग दोन दैनिक ४ | विभाग तीन मासिक ५ | विभाग तीन दैनिक ५ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रुपये | पैसे | रुपये | पैसे | रुपये | पैसे |
| १४ | बहिर्निष्कासन कार्य (प्रमुख) (एक्स्ट्रूजान ऑपरेशन) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १५ | लायसन्स नसलेला वीजतंत्री .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १६ | स्वयंचलित साचेकाम यंत्र-चालक (प्रमुख) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १७ | घर्षण यंत्रचालक (प्रमुख) .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १८ | निकेल प्लेटर .. .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १९ | केटल ऑपरेटर .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २० | एम्बॉसिंग यंत्र चालक (प्रमुख) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २१ | पॉईंट वेल्डिंग यंत्र चालक .. | | | | | | |
| २२ | बँगल कटर .. .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २३ | वरील नोंदीखाली येणाऱ्या व्यक्तींकडून करण्यात येणाऱ्या स्वरूपाचे अर्ध-कुशल 'अ' दर्जाचे काम करणारे कर्मचारी मग त्यांना कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| | कुशल | २३१·४० | ८·९० | २२६·२० | ८·७० | २२१·०० | ८·५० |
| १ | कलाकार (आर्टिस्ट) .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २ | बफ तांत्रिक .. | ... | ... | ... | ... | ... | ... |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | बँड स्विच तारतंत्री (वायरमन) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ४ | बॉक्स स्टिचिंग आणि स्टेन्सि-लिंग टेलर्स | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ५ | छिद्रके (हत्यारांच्या खोलीतील) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ६ | पटट् नियामक (रेडिओ) (Band Regulator) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ७ | गिरमिट (Broacher) .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ८ | बाष्पक परिचर .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ९ | लोहार .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १० | सुतार .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ११ | व्ही. ए. एम/सी यंत्रचालक (ऑपरेटर) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १२ | कॅप्स्टन लेथ ऑपरेटर (यंत्र हत्यार कक्ष) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १३ | मोटार चालक .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १४ | सक्षम तारतंत्री (लायसन्स धारक) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १५ | कुंडली परिवेष्टक (रेडिओ) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १६ | कॅबिनेट मेकर .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १७ | चार्ज-हँड/मिस्त्री .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १८ | क्लिव डाय मेकर (मशिन) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १९ | डाय मेकर .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २० | डाय सिटर .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २१ | डाय फिटर .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २२ | विघक (धातूच्या हत्यारांचा कक्ष) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २३ | खोदक/कोरक (एन्ग्रेव्हर) .. | ... | ... | ... | ... | ... | ... |

### अनुसूची एक—चालू

| अनुक्रमांक | कुशल | विभाग एक | | विभाग दोन | | विभाग तीन | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मासिक | दैनिक | मासिक | दैनिक | मासिक | दैनिक |
| | | रुपये | पैसे | रुपये | पैसे | रुपये | पैसे |
| २४ | लायसन्स असलेला वीजतंत्री (इलेक्ट्रिशियन) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २५ | इलेक्ट्रो प्लेटिंग तांत्रिक (टेक्निशिअन) आणि क्रोम व अॅनोडायझिंग तांत्रिक (टेक्निशिअन) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २६ | जोडारी (मशिन शॉप) .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २७ | वाक जोडारी (हत्यार कक्ष) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २८ | कार्यदेशक .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २९ | फॅब्रिकेटर .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ३० | फिल्म परिवेष्टक (वाइंडर) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ३१ | फाइन स्प्रेअर .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ३२ | फाइन पॉलिशर (हत्यार कक्ष) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ३३ | हॅकशॉ (Hackshaw) यंत्रचालक (ऑपरेटर) (हत्यार कक्ष) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ३४ | निरीक्षक .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ३५ | लॉरी चालक (ड्रायव्हर) .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ३६ | लेथ यंत्रचालक (हत्यार कक्ष) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ३७ | आकारक (मिलर) (हत्यार कक्ष) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ३८ | यंत्रचालक (मशीन ऑपरेटर) (हत्यार कक्ष) | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ३९ | यंत्र (मशीन) (हत्यार कक्ष) | ... | ... | ... | ... | ... | ... |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४० | धातू घर्षक (मेटर ग्राइंडर) (हत्यार कक्ष) | | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ४१ | यंत्र तांत्रिक (मशीन टेक्निशिअन) | | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ४२ | मोल्डर मेकर (हत्यार कक्ष) | | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ४३ | यांत्रिक चालक (हत्यार कक्ष) | | ... | ... | ... | ... | ... | .. |
| ४४ | मोटार यांत्रिक | .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ४५ | पेंटोग्राफर ऑपरेटर (हत्यार कक्ष) | | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ४६ | प्रेस सेटर (हत्यार कक्ष) | .. | ... | ... | ... | —.. | ... | ... |
| ४७ | प्रिंटर | .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ४८ | पॅटर्न मेकर | .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ४९ | रोलर ऑपरेटर | .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ५० | भांडारपाल | .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ५१ | पर्यवेक्षक .. | .. | ... | ... | ... | ... | ... | ... |
